गुरुवार, १९ ऑक्टोबर २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - ७५
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) THURSDAY 19 OCT. 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-03 ● ISSUE-75 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-5



जेजुरीत दांडिया गरबा नृत्य- जेजुरी येथील नवरागिणी ग्रुपच्या वतीने आयोजित रास गरबा या कार्यक्रमात महिलांनी मोठ्या संख्येने उत्साहात सहभाग घेतला. (छायाचित्र : विजयकुमार हरिश्चंद्रे )

# छगन भुजबळांसोबत फोटो नको

## लासलगाव कृ.ऊ.बा.स.सदस्य राजेंद्र बोरगुडे यांचा निर्णय

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड : मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी जालना जिल्ह्यातील आंतरवाली सराटी येथील मनोज जरांगे-पाटील यांनी १७ दिवस आमरण उपोषण केले. या आरक्षणाला पाठिंबा म्हणून लाखो मराठा समाज आंतरवली सराटी येथे जमा झाला होता. या दरम्यान राज्याचे अन्न पुरवठा व ग्राहक सरक्षण मंत्री नामदार छगन भुजबळ यांनी मराठा समाजाबद्दल बेताल वक्तव्य केले. या वक्तव्याचा नैताळे येथील टेंभी नाका ग्रुपच्या राजेंद्र बोरगुडे, नवनाथ बोरगुडे, शिंवाजी बोरगुडे, देविदास बोरगुडे, वाल्मीक बोरगुडे, दिलीप घायाळ, किशोर बोरगुडे, वैभव गाजरे, दत्तू भवर, योगेश बोरगुडे, चिंतामण देवरे, राहुल बोरगुडे, सोपान बोरगुडे, सुनिल बोरगुडे, सदाभाऊ कोटकर, नितीन बोरगुडे आदी सदस्यांनी निषेध व्यक्त केला.**



लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या माध्यमातून यापुढे दिल्या जाणाऱ्या जाहिराती तसेच होर्डिंगवर मंत्री भुजबळ यांचा फोटो असेल तर माझा फोटो व नाव टाळण्यात यावे, माझे नाव व फोटो देऊ नये असे समितीचे संचालक राजेंद्र बोरगुडे यांनी बाजार समितीला पत्र लिहून कळविले आहे. हे पत्र समाज माध्यमात व्हायरल झाले. मंत्री भुजबळ यांच्याच मतदार संघातील हनुमाननगर ग्रामपंचायतने एक ठराव पारीत करून भुजबळ यांचा निषेध व्यक्त करीत गावासाठी त्यांचा निधी न घेण्याचा निर्णय घेतल्याचे सरपंच यांच्या सही शिक्क्यानीशी पत्र व्हायरल झाले. त्यानंतर आज ब्राम्हणगाव विंचुर येथे मराठा आरक्षण मिळेपर्यंत मंत्री भुजबळ किंवा त्यांचे स्वीय सहाय्यक यांना गावात प्रवेशबंदी करीत असल्याची पोस्ट समाजमाध्यमात व्हायरल झाली आहे. भुजबळ यांच्याच मतदार संघात त्यांच्याविषयी मराठा समाजात नाराजीचा सूर असला तरी मतदार संघातील महत्वाच्या मराठा राजकीय नेत्यांनी भुजबळ यांच्या वाढदिवशी भुजबळ फार्म येथे भेट देऊन शुभेच्छा दिल्या. येवला लासलगाव मतदार संघात ओबीसींची संख्या निर्णयक असली तरी भुजबळ यांना निवडून आणण्यात मराठा समाजाचे मोठे योगदान राहिले आहे. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीत मराठा समाज नेमकी काय भूमिका घेतो यावर त्यांचे विजयाचे गणित अवलंबुन असणार आहे.

# केंद्रीय कर्मचाऱ्यांना दिवाळी भेट

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** सणासुदीच्या तोंडावर केंद्र सरकारने करोडो कर्मचाऱ्यांना आनंदवार्ता दिली आहे. मोदी सरकारने केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात (डीए) ४ टक्क्यांनी वाढ करण्याची घोषणा केली. यासह केंद्रीय कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता आता ४२ टक्क्यांवरून ४६ टक्क्यांवर पोहोचला असून वाढलेला डीए १ जुलैपासून लागू होईल. सरकारच्या नव्या निर्णयाचा फायदा एक कोटींहून अधिक केंद्रीय कर्मचाऱ्यांना होणार असून यामध्ये ६० लाखांहून अधिक पेन्शनधारकांचाही समावेश आहे. केंद्र सरकार वेळोवेळी आपल्या कर्मचार्‍यांचा महागाई भत्ता (DA) आणि पेन्शनधारकांच्या महागाई सवलतीत (DR) वाढ करते. केंद्र सरकार वर्षातून दोनदा म्हणजेच जानेवारी आणि जुलैमध्ये महागाईनुसार कर्मचाऱ्यांच्या भत्त्यात सुधारणा करते. यापूर्वी जानेवारीत डीएमध्ये चार टक्के वाढ करण्यात आली होती. तर केंद्र सरकारच्या कर्मचार्‍यांसाठी DA ची गणना औद्योगिक कामगारांसाठी (CPI-IW) ग्राहक किंमत निर्देशांकाच्या आधारे केली जाते. केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या पगारात महागाई भत्ता महत्त्वाची भूमिका बजावतो. सरकार वर्षातून दोनदा DA मध्ये सुधारणा करते. ज्याचा लाभ त्यांना १ जानेवारी व १ जुलैपासून दिला जातो. महागाई भत्त्यात बदलाचा थेट परिणाम केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या पगारावर दिसून येतो. DA वाढल्याने कर्मचाऱ्यांच्या हातातील पगारही वाढतो. सरकार महागाई दराची आकडेवारी लक्षात घेऊन महागाई भत्त्याबाबत अंतिम निर्णय घेते.

# मीरा इंझे-साबळे बनल्या पहिल्या एसटीच्या चालक

## नवदुर्गेच्या हाती बसचे स्टिअरिंग

आधुनिक केसरी न्यूज

अविनाश घोगरे


घनसावंगी : 'या देवी सर्वभूतेषु शक्ती रूपेण संस्थिता, नमस्तस्यै नमस्तस्यै नमस्तस्यै नमो नमः' देवीच्या शक्तिंना नमन करणारा हा श्लोक आजच्या सशक्त आणि संघर्षशील महिलांना प्रतिबिंबित करतो. देवीच्या नऊ स्वरूपांमध्ये नऊ शक्ती असल्याचे मानले जाते.महिला ही जननी आहे. तिच्यात जन्मतःच या नऊही शक्ती असतात. मनाने प्रेम, वात्सल्य, कारुण्य आणि ममतेचे हृदय असणाऱ्या महिला प्रसंगी रणचंडिकेचाही अवतार धारण करतात. आलेल्या संकटावर मात करीत नवा अध्याय रचतात. आपल्यामध्ये असलेल्या कर्तृत्त्वाच्या बळावर यशाचे नवे शिखर गाठतात. आयुष्य म्हटले की संकटे आलीच. परंतु अशा संकटात नाउमेद न होता धाडसाने सामोरे गेलो तर यातूनही मार्ग निघतो आजच्या युगात वावरणाऱ्या नारीने आपल्यात असलेली ही शक्ती ओळखली आहे.घनसावंगी तालुक्यातील श्रीक्षेत्र कोठाळा येथील मीरा इंझे-साबळे जालना जिल्ह्यातील पहिल्या महिला बसचालक बनल्या आहेत. परिवहन महामंडळाच्या बस चालवण्यात आतापर्यंत पुरुष वाहकांचीच सत्ता होती. गेल्या काही वर्षांपासून बसमध्ये वाहक (कंडक्टर) म्हणून महिलांची भरती झाली पण चालक म्हणून महिला नव्हत्याच. हे त्यांचं काम नाही, ड्रायव्हिंग हे महिलांचं क्षेत्र नाही असं समजलं जात होतं. त्यामुळे महिला या क्षेत्रात नव्हत्या. पण आता या संकल्पनेला छेद देत तालुक्यातील.महिलेने बसचं स्टेअरींग हाती घेतलं आहे. परिस्थितीशी सामना करत, खडतर प्रशिक्षण पूर्ण करून एस. टीचं स्टेअरिंग हाती घेतलं. मीरा इंझे- साबळे यांनी पोलिस व्हायचं स्वप्न मनाशी बाळगून तयारी केली. परंतु, तीनवेळा एक ते दोन गुणांनी त्यांचे पोलिस भरतीचे स्वप्न अपूर्ण राहिले. त्यातच सरळ सेवेतून एसटी महामंडळात निघालेल्या चालक पदाच्या भरतीची परीक्षा दिली. त्यात यश संपादन करून त्यांनी चूल आणि मूल न सांभाळता एसटीचे स्टिअरिंग हाती घेऊन जिल्ह्यात पहिल्या महिला चालक बनण्याचा बहुमान मिळविला. २०१८-१९ मध्ये एसटी महामंडळाच्या सरळ सेवा भरतीमध्ये त्यांनी अर्ज केला आणि त्यांची निवड झाली. यातून जालना जिल्ह्यातील मीरा या पहिल्या महिला बस चालक ठरल्या. मिरा यांना पोलीस व्हायचं होतं, पण अनेक अडचणींना तोंड देत त्यांची संधी हुकली आणी त्या बस चाल झाल्या साडेतीन वर्षांचे खडतर प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांना राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे जालना विभाग नियंत्रक प्रमोद नेहूल यांनी २ जून रोजी बस चालक म्हणून नियुक्तीचे आदेश दिले. त्या अंबड आगारात रूजू झाल्या आहेत. त्या जालना जिल्ह्यातील पहिल्या बसचालक ठरल्या आहेत. त्यांना आगाप्रमुख रणवीर कोळपे, संकेत राठोड यांच्यासह अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मार्गदर्शन केले. मीरा यांनी छत्रपती संभाजीनगर इथे बस चालवण्याचं प्रशिक्षण पूर्ण केलं. प्रशिक्षण कालावधी पूर्ण झाल्यावर त्यांची जालना जिल्ह्यातील अंबड डेपोमध्ये बस चालवण्याची सुरुवात झाली आहे. ड्रायव्हिंग हे क्षेत्र मुळात कष्टाचं, त्यात बस चालवणं अतिशय जिकरीचं. प्रवाशांचा प्रवास सुरक्षित करण्याचं मोठं आव्हान असतं. त्यात मानसिक आणि शारीरिक त्राण असतो. त्यावर मात करत मिरा ताईंनी अंबड ते कुंभार पिंपळगाव अशी पहिली प्रवासी ट्रीप पूर्ण केली आणी आज त्या आपली सेवा बजावत आहेत.



### वडिलांच्या मृत्यूनंतर आईने वाढवलं

वडिलांच्या मृत्यूनंतर मिराला एक बहीण आहे तिच्यासह मिराच्या शिक्षणाची जबाबदारी आई प्रयागबाई यांच्यावर येऊन पडली होती . त्यांनी मोलमजुरी करत मिराला व बहिनिला बारावीपर्यंत शिकवलं . त्यांची शिकण्याची जिद्द पाहून मिराच्या आईसह पतीनही त्यांना प्रोत्साहन देत बी .ए पर्यंतचं शिक्षण पूर्ण करून त्यांना प्रशिक्षणासह चालका पर्यंत बळ दिल .

आपल्या आई वडिलांच्या आशीर्वाद तसेच कुटुंबातील सदस्यांचे प्रोत्साहन मिळाले या मुळे मी बस चालक म्हणून नोकरी करण्याचे धाडस केले आयुष्य म्हटले की संकटे आलीच . परंतु अशा संकटात नाउमेद न होता धाडसाने सामोरे गेलो तर यातूनही मार्ग निघतो . **मीरा इंझे साबळे**





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

## ऐसी अक्षरे रसिके

आधुनिक केसरी

पण काही असो लेखनकलेने जीवनाच्या सर्व क्षेत्रात क्रांती घडवली. त्यामुळेच विविध विचारवंतांचे विचार आपल्यापर्यंत पोहोचले. शिलालेख आले, मृत्युलेख आले. इच्छापत्र आले आणि मृत्युपत्रही आले. प्रेमी जीवांनी एकमेकांना लिहिलेली प्रेमपत्रं आली. रुख्मिणीनं श्रीकृष्णाला लिहिलेलं प्रेमपत्रं त्यामुळेच लिहिलं गेलं. चांगदेवांनी ज्ञानेश्वरांना लिहिलेलं ( अर्थातच कोरं ) पत्रही आलं. कविता, लेख, कादंबऱ्या, चरित्रं, आत्मचरित्रं आली. साहित्यविश्व समृध्द झालं. पूर्वी शाळेमध्ये लहान मुलांना अक्षर चांगलं करण्यासाठी कित्ता गिरवायला लावीत. त्यासाठी बोरू किंवा टाकाचा वापर केला जात असे. आजच्या मुलांना बोरू, टाक, दौत इ. गोष्टी दाखवण्यासाठी वस्तुसंग्रहालयातच घेऊन जावं लागेल. पण पूर्वी जे कित्ते गिरवले जायचे त्यावरून एखाद्या व्यक्तीच्या वागण्याबोलण्याचे अनुकरण केले की त्याने अमुक व्यक्तीचा 'कित्ता गिरवला' असा शब्दप्रयोग रूढ झाला.

आपणही चांगल्या व्यक्तींचा कित्ता गिरवायला हरकत नाही. ज्ञानेश्वर माउली म्हणतात, 'ऐसी अक्षरे रसिके मेळवीन' आपणही हे अक्षरब्रह्म जपू या. लिहू या, वाचू या. काळाच्या कसोटीवर उतरणाऱ्या, चिरकाल टिकणाऱ्या आणि युगांयुगांचा दीपस्तंभ असलेल्या वांड्मयाला आपण अक्षरसाहित्य म्हणतो. अक्षरसाहित्य हा आपला वारसा आहे, संस्कृती आहे. हे अक्षरब्रह्म आपल्या जीवनाला समृद्धीकडे घेऊन जाणारे आहे. शर्वरीला प्रसिद्ध शास्त्रज्ञ स्टीफन हॉकिंग यांची आठवण झाली स्टीफन हॉकिंग यांना आपल्या आजारामुळे अन्य काही करणं शक्य नव्हतं परंतु आपल्या बोटांच्या हालचालींचा आधार घेऊन आपले विचार ते मांडत होते त्यांची आठवण झाली आणि तिच्या चेहऱ्यावर स्मित झळकलं. सुषमानं दिलेली डायरी शर्वरीनं हातात घेतली आणि अक्षरब्रह्माची आराधना करण्यात ती रंगून गेली.






## ।। पसायदान ।।

आधुनिक केसरी

आता विश्वात्मकें देवें । येणे वाग्यज्ञें तोषावें ।
तोषोनिं मज द्यावे । पसायदान हें ॥

जें खळांची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी- रती वाढो ।
भूतां परस्परे पडो । मैत्र जिवाचें ॥

दुरितांचे तिमिर जावो । विश्व स्वधर्म सूर्ये पाहो ।
जो जे वांच्छिल तो तें लाहो । प्राणिजात ॥

वर्षत सकळ मंगळी । ईश्वरनिष्ठांची मांदियाळी ।
अनवरत भूमंडळी । भेटतु भूतां ॥

चलां कल्पतरूंचे आरव । चेतना चिंतामणींचें गाव ।
बोलते जे अर्णव । पीयूषाचे ॥

चंद्रमे जे अलांछन । मार्तंड जे तापहीन ।
ते सर्वांही सदा सज्जन । सोयरे होतु ॥

किंबहुना सर्व सुखी । पूर्ण होऊनि तिन्हीं लोकी ।
भजिजो आदिपुरुखी । अखंडित ॥

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं इयें ।
दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।

येथ ह्मणे श्री विश्वेशराओ । हा होईल दान पसावो ।
येणें वरें ज्ञानदेवो । सुखिया जाला ॥



आधुनिक केसरी

**अभंगचि पैस | व्हावा आता ||**
धन्य आजी झालो | लाभला विसावा ||
सुखावलो देवा | पैस संगे ||१||
ज्ञानाचिये ठायी | वैराग्य नांदते ||
तेथे विसावते | शांती ब्रह्म ||२||
भाग्यवंता लाभे | तुझी कृपा छाया ||
माऊलींची माया | ब्रह्म सुख ||३||
पाणावल्या नेत्री | शब्द गंगा दाटे ||
चरणाशी भेटे | माऊलींच्या ||४||
नको देणे घेणे | नको लोभ आस ||
अभंगची पैस | व्हावा आता ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी

तेथें निर्मळपणाचा सोहळा । केवी घडे ॥१२॥ रजस्वलेचा जो विटाळ । त्याचा आळोन जाला गाळ । त्या गळाचेंच केवळ । शरीर हें ॥१३॥ वरी वरी दिसे वैभवाचें । अंतरीं पोतडें नर्काचें । जैसें झांकणें चर्मकुंडाचें । उघडितांच नये ॥ १४॥ कुंड धुतां शुद्ध होतें । यास प्रत्यईं धुईजेतें ।




डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

उनइस सौ है बानबे, सं. १९९२ है, माघ कृष्ण है पक्ष । सद्गुरु मोहि अपनाइया, निज मत कर गये दक्ष ।।२२।।(स्वर्वेद प्रथम मण्डल षष्ठ अध्याय) ०१/०६/२२

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
विक्रम संवत १९९२ च्या माघ कृष्ण पक्षात नित्य अनादि सद्गुरू सुकृतदेवांनी ग्रंथकार सद्गुरू सदाफल देवजी महाराजांना सद्गुरू पदासाठी स्विकार करून आपल्या अध्यात्म कलेची गुह्य भेद ज्ञान युक्ती सांगून त्यांच्या सद्गुरू पदाला स्विकृती दिली . नित्य अनादि सद्गुरूदेवांचे दर्शन आणि त्यांचे भेदिक तत्त्वज्ञान प्राप्त झाल्यावर तसेच त्यांच्या आत्म-स्विकृतीद्वारेच सद्गुरू पद प्राप्त होते. ज्यांना ते आपला अनन्य भक्त समजून शरणात ठेवतात तेच महापुरूष त्यांच्या द्वारे स्विकृत होऊन सद्गुरू पदावर सुशोभित होतात.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## काव्य-चरितावली

आधुनिक केसरी

पुष्प ४८वे

श्री महाराज गोंदवल्यात स्थिरावले । राम मंदिर गजबजून गेले । रामनाम जन मनात रुजू लागले । महाराजांच्या सहवसात ।। १ ।।
जे ओळखीचे ते आपले मानले । परक्यांना आपलेसे केले । लहान थोरांना जवळ केले । रामनाम घेण्या ।। २ ।। बाळंभट्टाचे व्यसन सोडविले। आप्पासाहेबांना बोलाविले। भाकर -झुणका द्या बापूसाहेबांना, महाराज म्हणाले।
खाता भाकरी, दुखणे थांबले। बापूसाहेबांचे कायमचे ।। ३ ।। भक्तसाठी, लोकांसाठी, । भोळ्या अडाणी, शिक्षितासाठी । माया, कळकळ मनात मोठी । श्री महाराजांच्या ।। ४।। कवी -अरुणदास जातो भारावुनी हे सारे क्रमशः लिहिता ।।




अरुण वि. देशपांडे
संपर्क क्र. 9850177342

## आपण आपला खरा स्वार्थ साधतच नाही

आधुनिक केसरी

पुष्कळ वाचले, ऐकले, पण कृतीत जर उतरले नाही तर त्याचा काय उपयोग ? कृतीशिवाय समाधान नाही. श्रवण कोणी केले ? तर ज्यांनी त्याप्रमाणे कृती केली त्यांनी. संतांच्या सांगण्याचा आपण विचारच केला नाही, त्याचे मननच जर केले नाही, तर पुष्कळ सांगितले तरी त्याचा काय उपयोग ? देह हा अनित्य आहे, असे सर्व संतांनी एकमुखाने सांगितले आहे. तरीसुद्धा आम्हांला देहाचे प्रेम सुटत नाही, याला काय करावे ? संतांवर विश्वास नसेल तर स्वतःचा अनुभव पाहावा. देहापासून सर्व सुख आहे असे आपण विचाराने ठरविले, पण खरोखर अनुभव काय येतो हे पाहावे. आपण पाहतो ना, की लहानापासून मोठयापर्यंत आणि रावापासून रंकापर्यंत, मनुष्याची सारखी धडपड चालू असते, आणि ती म्हणजे समाधानासाठी. लहानाचे मोठे झालो, विद्या झाली, नोकरी मिळाली, पैसा-अडका मिळतो आहे, बायको केली, मुलेबाळे झाली; ज्या ज्या गोष्टीत समाधान मिळेल असे वाटले, त्या त्या करिता प्रयत्न केला. परंतु मग तरी समाधानाचा लाभ झाला



का ? देहाच्या प्रेमाशिवाय प्रापंचिक गोष्टी चालणार नाहीत हे खरे; पण म्हणून देहाच्या सुखाकरिताच जन्मभर आटापिटा करायचा हे योग्य नव्हे. आपण आपला खरा स्वार्थ साधतच नाही. या देहाचे कौतुक करीत असताना दुसऱ्याची घरभरणी चालली आहे. त्याचा फायदा आपल्याला काहीच होत नाही. देह गेला की सगळे गेले ! कृतीशिवाय जे बोलतात त्यांचा नाश होतो. बोलावे असे वाटते तोपर्यंत बोलणे थांबविणे जरूर आहे. स्वतंत्रता आणि स्वैरवर्तन बाहेरून सारखीच दिसतात; पण त्यांच्यामध्ये फार फरक आहे. स्वतंत्रता ही पवित्र आहे, तर स्वैरवर्तन हे घाणेरडे आहे. लोकांच्या स्वतंत्रतेविषयीच्या कल्पना काहीतरीच असतात. खरे म्हणजे, माणसाला स्वतंत्रता फक्त स्वतःची उन्नती, म्हणजे आत्मोन्नती करण्यापुरतेच आहे. इतर बाबतीत, म्हणजे देहाच्या वगैरे बाबतीत, त्याला बंधनेच असतात, आणि ती आवश्यकच आहेत. देहासंबंधीचे बाप, मुलगा, नवरा, बायको, वगैरे म्हणून प्रत्येकाचे कर्तव्य राहणारच, पण मनुष्यत्वाचे कर्तव्य असेल तर भगवंताचे होणे हे आहे. ऑफिसला जाणाऱ्यांनी आपले कर्तव्य नीट बजावावे; घरातल्या मंडळींनी आपले काम मन लावून करावे; आणि हे सर्व करून राहिलेला वेळ भगवंताच्या नामात घालवावा. आपण एखादा व्यापार केला तर त्यामध्ये निव्वळ उत्पन्न हाच आपला खरा नफा असतो, त्याचप्रमाणे प्रपंचातला नफा म्हणजे भगवंताकडे आपले लक्ष किती लागले हा होय.

## गहिनीनाथ



मठात कान्होबा, पर्वती, मच्छिंद्र, त्याच्या पूर्वेस जालंदर, त्याच्या पलीकडे गहिनीनाथ असे ऐकून त्याने तीं नावे पालटून दुसरी ठेविली, तीं अशीं: जानपीर असें नांव जालंदरास दिलें. गैरीपीर हें नांव गहिनीनाथास ठेविलें. मच्छिंद्राचें मायाबाबलेन व कानिफाचें कान्होबा अशी नांवें ठेवून तेथें यवन पुजारी ठेविले. कल्याण कलयुगीं बाबाचैतन्य यांची समाधि होती, पण तें नांव बदलून राववागशर असें नांव ठेविलें. गोरक्ष आपल्या आश्रमीं सटव्यांस ठेवून तीर्थयात्रेस गेला. नवनाथ बहुत दिवसपर्यंत तीर्थयात्रा करित होते. शके सत्राशे दहापर्यंत ते प्रकटरूपाने फिरत होते. नंतर गुप्त झाले. एका मठीमध्ये कानिफा राहिला. त्याच्याजवळ पण वरच्या बाजूने मच्छिंद्रनाथ ज्याच्या बायबा असे म्हणतात तो राहिला.

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
गुरुवार, १९ ऑक्टोबर २०२३
adhunikkesari.com Adhunik Kesari

# धनगर समाजाच्या आरक्षणाचा पहिला फटका बारामतीला

## गोपीचंद पडळकर यांची टीका

आधुनिक केसरी न्यूज

**वाई :** धनगर व धनगड असा शब्दछल करत शरद पवारांनी धनगर आरक्षणाला विरोध केला. यामुळे धनगर समाजाच्या आरक्षणाचा पहिला फटका बारामतीला बसणार असल्याची टीका धनगर समाजाचे नेते आमदार गोपीचंद पडळकर यांनी केली आहे. धनगर आरक्षणासाठीच्या 'धनगर जागर'यात्रे निमित्त लोणंद (ता खंडाळा) येथील जाहीर सभेत आमदार पडळकर बोलत होते. या वेळी ज्येष्ठ नेते आनंदराव शेळके-पाटील, माजी सभापती रमेश धायगुडे-पाटील आदी प्रमुख उपस्थित होते. आमदार पडळकर म्हणाले, धनगर समाजाला आरक्षण मिळाले, तर त्याचा पहिला फटका बारामतीला बसणार आहे. म्हणूनच शरद पवारांनी धनगर आरक्षणाला विरोध केला. धनगर समाजात ऊर्जा यावी, त्यांच्यातील भीती दूर व्हावी, यासाठी कशाचीही पर्वा न करता कोणालाही जाऊन भिडतो आहे. तरीही भीती जाणार नसेल तर साहेब, ताई, दादा, आबांचे खूळ डोक्यातून काढा. ही गुलाम बनवणारी यंत्रणा आहे. या पदांना प्रथम मूठमाती द्या, तरच तुम्हाला राजे होता येईल. गट, तट, पक्ष विसरून धनगर समाजाच्या आरक्षणाच्या लढ्यात सर्वांनी एकजुटीने सहभागी होण्याचे आवाहन पडळकर यांनी केले. धनगर समाजाला आरक्षण मिळाले, तर त्याचा पहिला फटका बारामतीला बसणार आहे. धनगर व धनगड असा शब्दछल करत खो घालण्याचे काम केले. आरेवाडी येथे होणाऱ्या दसरा मेळाव्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहनही या वेळी त्यांनी केले.

# सारथी संशोधकाचे आमरण उपोषण

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्र शासनाने कुणबी, मराठा, मराठा-कुणबी आणि कुणबी -मराठा समाजासाठी छत्रपती शाहू महाराज संशोधन प्रशिक्षण व मानव विकास संस्था अर्थात सारथी फेलोशिप सुरू केलेली आहे. ही योजना गेल्या 2019 पासून कार्यान्वित असून आजपर्यंत या संस्थेअंतर्गत 2100 विद्यार्थ्यांना फेलोशिपचा लाभ दिला जातो. या संशोधक विद्यार्थ्यांच्या अनेक मागण्या वेळोवेळी उपोषणे, आंदोलने करून देखील पूर्ण केलेल्या नसल्यामुळे आजपासून महाराष्ट्रातील विविध ठिकाणी संशोधक विद्यार्थी सारथी कार्यालयाच्या ठिकाणी आमरण उपोषणास बसलेले आहेत. छत्रपती संभाजीनगर येथील सारथी विभागीय कार्यालयाच्या ठिकाणी आजपासून आमरण उपोषण सुरू झालेले आहे. यामध्ये प्रामुख्याने ज्या मागण्या केलेले आहेत. त्यात 2019 पासून संशोधन करत असलेल्या संशोधक विद्यार्थ्यांना विद्यापीठ नोंदणी दिनांकपासून फेलोशिप देण्यात यावी. यावर्षी शासनाने फेलोशिप संख्या केवळ 50 इतकी सल केली असून ती तात्काळ रद्द करण्यात यावी व सर्व अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांना सरसकट फेलोशिप देण्यात यावी. एका कुटुंबातील एकच उमेदवार ही अट रद्द करून अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांना फेलोशिपसाठी ग्राह्य धरावे. त्यामुळे शासनाने लवकरात लवकर संशोधक विद्यार्थ्यांच्या मागण्या पूर्ण कराव्यात याकरिता हे आमरण उपोषण सुरू आहे. यामध्ये अजय पवार, अप्पासाहेब चव्हाण भागवत निकम हे आमरण उपोषणास बसलेले आहेत. त्याशिवाय डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर अंतर्गत असलेले सारथी संशोधक त्यामध्ये सहभागी आहेत.






# शासन आपल्या दारी उपक्रमांतर्गत शिबिर

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** शासन आपल्या दारी उपक्रमांतर्गत मुख्यमंत्री जलकल्याण कक्षांचे विशेष अधिकारी, मुख्यमंत्री सचिवालय मंगेश चिवटे यांच्या उपस्थितीत पालकमंत्री संदिपान भुमरे यांच्या मार्गदर्शनाखाली व विलास बापू भुमरे यांच्या सहकार्याने पिंपळवाडी [ पि ] तालुका पैठण येथे भव्य रोग निदान शिबिर तसेच मोफत डोळे तपासणी शिबिर बुधवार रोजी सकाळी अकरा वाजता संपन्न झाले. या आरोग्य शिबीरात जवळजवळ पाचशे रुग्णाची मोफत तपासणी केली तर दोनशे रुग्णांचे मोफत नेत्र तपासणी करण्यात आली. ज्या रुग्णांवरती शस्त्रक्रिया करायची आहे अशा रुग्णावरती लवकरच शस्त्रक्रिया केली जाणार असल्याचे जनसंपर्क अधिकारी मुख्यमंत्री जनकल्याण कक्ष मुख्यमंत्री संचालयाचे दादासाहेब थेटे यांनी सांगितले. यावेळी डॉ. विनोद चावरे लायन्स क्लबचे डॉ. गायकवाड वैद्यकीय अधिकारी डॉ.सचिन अवसरमोल संचालक भाऊ लबडे जिल्हा समन्वयक ज्ञानेश्वर गायके सरपंच रेणुका राजु दिलवाले, योगेश सोनवणे, भरत मुकुटमल, धनंजय मोरे उपसरपंच दादासाहेब गलांडे, पोपट ढाकणे, ग्रामपंचायत सदस्य बिलालभाई शेख, रावसाहेब थोटे, रहीम्मोदीन टेलर, अमित शिंदे, दादासाहेब चाबुकस्वार, संजय दिलवाले, सुभाष गिरे, विनायक गिरे, ग्रामविकास अधिकारी राजू दिलवाले, पोलीस पाटील अशोक चाबुकस्वार सह आदींची यावेळी उपस्थिती होती.

# वीज वितरण कंपनीने विभाजन करावे

आधुनिक केसरी न्यूज

**इगतपुरी :** तालुक्यात विशेषतः पूर्व भागात विजेचा प्रश्न नेहमीच डोके वर काढत असतो. तालुक्यात साध्यस्थितित सुरळीत विजपुरवठा होत असला तरि वाडीव-हे 33 केव्ही विजकेंद्राअंतर्गत असलेले आणि भौगोलिक दृष्टया सुमारे 47 किमी इतके मोठे अंतर असलेल्या नांदगांव बु फीडर वर जास्त लोड येत असल्याने पूर्व भागातील सात आठ गावे नेहमीच अंधारात राहत आहेत. या फीडर वर नांदगांव बु सह अस्वली दक्षिण भाग,नांदूर वैद्य परिसर, जानोरी व मळे विभागाचा आणि तालुक्याचे शेवट चे टोक असलेल्या वंजरवाड़ी परिसरातील एका विजेच्या पोल पर्यंत असा 47 किमी परिसर येतो. शिवाय या परिसरातील सर्वच लोखंडी विद्युत पोल हे 1972 ते 75 च्या काळातील बसवलेले असून ते जीर्ण व गंजलेले आहेत. या पैकी शेकडो पोल जमींदोस्त होण्याच्या मार्गावर आहेत. अनेक ठिकाणी विद्युत तारा लोंबकळत असूनही अधिकारी दुर्लक्ष करत असल्याचा आरोप श्याम मुसळे यांनी केला आहे. त्यामुळे जिल्ह्यातील सर्वात बकवास आणि दुर्लक्षहीन असलेल्या या फीडरचे विभाजन करून नवीन यंत्र सामग्री सह विज यंत्रणा सुरु करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे. इगतपुरी तालुक्यातील गोंदे/वाडीव-हे या दोन औद्योगिक वसाहती, सुमारे चाळीस गावे-वाड्या-पाड़या आणि बावीस ग्रामपंचायती तसेच आठवा मेल ते बळवंत वाडी व नांदगाव बु|| ते थेट किष्किंदा नगरी पर्यंत जवळपास सुमारे दोनशे किमी अंतर असलेल्या भागातील वरील गावांचा विजेचा भार सोसुन ग्राहकांना सुरळीत विजपूरवठा देण्याचा आटोकात प्रयत्न करणा-या वाडीव-हे येथील महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी च्या ३३/११ वीजउपकेंद्रातिल एकूण आठ फीडर च्या नूतनिकरणासाठी सुमारे ८ कोटी ६५ लाख रूपयांच्या निधीची गरज निर्माण झाली होती. आमदार हिरामण खोसकर, विज वितरण मुख्य अभियंता मंगेश प्रजापती यांनी तात्काळ नांदगांव फीडर विभाजन करून जानोरी गाव आणि उंडओहोळ नदीचा दक्षिण परिसर शेनवड ला जोड़ावा अशी मागणी सरपंच देविदास मोरे,अर्जुन भोर,सुदामभोर,एकनाथ भोर यांनी केली आहे.

# दहेगाव शिवारात गटसचिवाचा आकस्मिक मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**चारठाणा :** शेतात फेरफटका मारून स्प्रिंक्लर लावून येतो म्हणून गेलेले सोसायटीचे दत्तराव ढोणे ( वय ३८ ) हे रात्री उशिरा दहापर्यंत घरी न परतल्याने घरच्या लोकांनी शोध घेतला असता शेतात ते मृतावस्थेत आढळून आले. सदरील घटना जिंतूर तालुक्यातील दहेगाव येथे घडली असून दरम्यान त्यांचा हृदयविकाराने मृत्यू झाला असावा, असा कयास लावला जात आहे. दहेगांव शेतशिवारात पाच एकर शेती असून सोमवारी (दि. १६) दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास शेतात फेरफटका मारून कापसाला पाणी देण्यासाठी स्प्रिंकलर लावून येतो, असे सांगून गेले होते. परंतु रात्रीचे दहा वाजेपर्यंत घरी परतले नसल्याने घरच्या लोकांनी ठावठिकाणा घेतला असता ते शेतात मृतावस्थेत आढळून आले. त्यांचा हृदयविकाराने मृत्यू झाला असावा, असा अंदाज आहे. दरम्यान, घटनास्थळी पोलीस पंचनामा करण्यात आला असून मयताचे शवविच्छेदन जिंतूर येथील ग्रामीण रुग्णालयात मंगळवारी (दि.१७) रोजी सकाळी १०.३० वाजण्याच्या सुमारास करण्यात आले. दुपारी २ वाजण्याच्या सुमारास दत्तराव ढोणे यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात आई-वडिल, पत्नी, मुलगा, मुलगी असा परिवार आहे. गटसचिव दत्तराव ढोणे यांच्या अकाली निधनाने जिंतूर तालुक्यातील दहेगांव येथील रहिवासी असलेले दत्तराव संतोबाराव ढोणे (वय ३८) हे सेनगाव तालुक्यातील एका विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीवर गटसचिव म्हणून कार्यरत होते. त्यांची परिसरात हळहळ व्यक्त होत आहे..



# चेंडू संसदेच्या कोर्टात

आधुनिक केसरी

आम्ही यासंदर्भात कायदा तयार करू शकत नाही, आम्ही फक्त कायद्याचा अन्वयार्थ लावू शकतो. कायदा करण्याचा अधिकार संसदेला आहे,' असे सांगून मंगळवारी सर्वोच्च न्यायालयाने समलिंगी विवाहाचा चेंडू संसदेच्या कोर्टात टोलावला आहे. या जोडप्यांना मुलेही दत्तक घेता येणार नाहीत. विशेष विवाह कायद्याचा मुद्दा न्यायालयाच्या नव्हे तर संसदेच्या अखत्यारीत असल्याचा निकाल सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या नेतृत्वाखालील न्या. एस .के कौल, न्या. एस. आर भट, न्या. हिमा कोहली आणि न्या. पी. एस नरसिंहा यांच्या घटनापीठाने दिला असला तरी, आजच्या निर्णयामुळे काही महत्त्वाचे मुद्दे अधिक स्पष्ट झाले आहेत आणि काही मुद्द्यांवर समलिंगी समुदायाला संरक्षणही मिळाले आहे. या मुद्द्यावर देशभरात २० याचिका दाखल होत्या. एलजीबीटीक्यू प्लस समुदायाला विवाहाचा अधिकार मिळावा, यासाठी दाखल असलेल्या याचिकांची सुनावणी एकत्रितपणे झाली. ही सुनावणी घटनापीठाकडे सोपवण्यात आली होती. ज्येष्ठ विधिज्ञ मुकुल रोहतगी, अभिषेक मनु संघवी, मेनका गुरुस्वामी, अरुंधती काटजू यांनी याचिकाकर्त्यांची बाजू मांडली, तर सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी सरकारच्या बाजूने प्रतिवाद केला. एजीबीटीक्यूप्लस म्हणजेच पारलिंगी व्यक्तींना विवाहाचा अधिकार असायला हवा, असे मत सरन्यायाधीशांनी नोंदवले असले तरी, तसा कायदा करण्याचा अधिकार संसदेलाच असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. सर्वोच्च न्यायालय संसद किंवा राज्यांच्या विधिमंडळांना विवाहाची नवीन संस्था तयार करण्यास भाग पाडू शकत नाही. पारलिंगी व्यक्तीला विषमलैंगिक व्यक्तीशी लग्न करायचे असेल तर अशा विवाहामध्ये एकाला पुरुष आणि दुसऱ्याला स्त्री म्हणून ओळखले जाईल. पारलिंगी पुरुषाला स्त्रीशी लग्न करण्याचा अधिकार आहे, पारलिंगी स्त्रीला पुरुष आणि अन्य पारलिंगीशी लग्न करण्याचा अधिकार आहे. महिला आणि पारलिंगी पुरुष देखील लग्न करू शकतात, असे मत त्यांनी व्यक्त केले.
-समलैंगिकता ही मुळीच शहरी उच्चभ्रू संकल्पना नाही, असेही न्यायालयाने ठणकावले. हा मुद्दा सरकारतर्फे सुनावणीदरम्यान वारंवार मांडला जात होता. भिन्न लैंगिक ओळख ही सामाजिक स्थिती किंवा आर्थिक संपन्नतेवर अवलंबून नाही, हे स्पष्ट करून विवाह ही एक स्थिर किंवा अपरिवर्तित संस्था राहू शकत नाही, असे ठाम मत घटनापीठाने व्यक्त केले. -पुरुष आणि स्त्री किंवा पती आणि पत्नी याचे अर्थ लावण्यासाठी कायदेशीर तरतुदींची पुनर्रचना करू शकत नाही. कलम २१ अंतर्गत जगण्याचा अधिकार सन्मान आणि गोपनीयता सुनिश्चित करतो.

# इस्रायल-पॅलेस्टाईन संघर्ष आणि भारत



डॉ.संतोष संभाजी डाखरे
संपर्क क्र.: ८२७५२९१५९६

आधुनिक केसरी

**सध्या सर्वत्र इस्रायल-पॅलेस्टाईन युद्धाच्या चर्चा सुरू आहेत. गेल्या आठवड्यात सुरू झालेल्या या युद्धाची तीव्रता आता अधिक वाढली आहे. इसरायली पंतप्रधान बेंजामिन नेत्यांनेहू यांनी तर 'युद्ध आम्ही सुरू केले नसले तरी ते आम्ही संपवू' अशी भीमगर्जना केली आहे. आता तर हमास या दहशतवादी संघटनेचा पूर्णतः सफाया करूनच हे युद्ध थांबेल असे चिन्ह दिसत आहे. इस्रायल-पॅलेस्टाईन संघर्ष समजून घेण्यासाठी एक शतक मागे जावे लागेल. मध्यपूर्वेत तेव्हा ऑटोमन साम्राज्याचा विस्तार झाला होता. पहिल्या महायुद्धात या साम्राज्याचा पराभव झाल्यानंतर पॅलेस्टाईन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या प्रदेशाचा ताबा ब्रिटनकडे आला. तेव्हा या प्रदेशात ज्यू, अरब आणि अन्य वांशिक गट राहत होते. अरब बहुसंख्य तर ज्यू अल्पसंख्य अशी स्थिती होती.**

जर्मनीत ज्यूंवर अनन्वित अत्याचार होत असल्याने त्यांच्यासाठी स्वतंत्र देश असावा अशी मागणी जोर धरू लागली होती.
ब्रिटनकडे पॅलेस्टाईन प्रदेशाचा ताबा असल्याने ब्रिटननेच पॅलेस्टाईन मध्ये ज्यू लोकांसाठी स्वतंत्र देश निर्माण करावा अशी जबाबदारी आंतरराष्ट्रीय समुदायाने ब्रिटनवर सोपवलेली होती. जर्मनीच्या छळाला कंटाळून ज्यू देश सोडत होते. अनेक देशांची दारं त्यांना बंद असल्याने ते पॅलेस्टाईनमध्ये आश्रय घेत होते. हळूहळू त्यांची संख्या वाढू लागल्याने अरबांशी त्यांचा संघर्ष सुरू झाला. ज्यूसाठी ब्रिटनच्या स्वतंत्र देश निर्मितीच्या हालचाली पॅलेस्टाईनमधील अरबांना समजू लागताच त्यांचा विरोध वाढू लागला.
अशातच संयुक्त राष्ट्रांनी पॅलेस्टाईनचे अरब आणि ज्यू अशा दोन राज्यांमध्ये विभाजन करण्यासाठी मतदान केलं आणि पॅलेस्टाईनचे दोन भाग केल्याचे जाहीर केले. अरबांनी संयुक्त राष्ट्रांचा हा निर्णय मान्य केला नाही.
कालांतराने ब्रिटननेही या प्रकरणातून हात झटकले. ज्यूनी या संधीचा लाभ घेत मे 1948 मध्ये स्वतंत्र इसराइल देशाची घोषणा केली. दुसऱ्याच दिवशी शेजारील पाच अरब राष्ट्रांनी इस्रायलवर आक्रमण केले. मात्र इस्रायल या अरब देशांना पुरून उरला. इस्रायलने हे युद्ध जिंकलेच नाही तर अरबांच्याच भूमीवरून लाखो अरबांना हुसकावून लावले. त्यामुळे तेव्हापासूनच अरब (पॅलेस्टाईन) आणि ज्यू (इस्रायल) यांच्यामध्ये संघर्ष सुरू आहे. तेव्हापासून अनेकदा पॅलेस्टाईन आणि इस्रायलमध्ये युद्ध झालेत आणि प्रत्येक वेळेस इस्रायलने पॅलेस्टाईनचा नव-नवा प्रदेश गिळंकृत केला. आज जो गाजा प्रांत युद्धाच्या केंद्रस्थानी आहे, तो गाजा सुद्धा कधीकाळी इस्रायलने स्वतःकडे ठेवला होता. मात्र 2005 नंतर या प्रांतातून त्यांनी सैन्य परत घेतले. पुढे या प्रांतात स्थानिक निवडणुका झाल्यात आणि तिथे हमास नावाचे संघटन सत्तेवर आले. या हमासने पॅलेस्टिनींच्या भावनेला हात घातला, इस्रायलने आजवर अरबांवर कसा अन्याय केला याचा पाढा वाचला, शतक भरात हक्काच्या भूमीवरून पॅलेस्टिनी कसे हुसकावून लावण्यात आले याचे संदर्भ दिले. त्यामुळे दुखावलेल्या अरबांचा हमासला पाठिंबा वाढू लागला आणि शंभर वर्षांपूर्वीचे पॅलेस्टाईनचे वैभव परत मिळवण्याकरिता हमासने कंबर कसली. त्यामुळे जेव्हा-जेव्हा संधी मिळते तेव्हा-तेव्हा पॅलेस्टाईन इस्रायल्वर आक्रमण करीत असते. एकादृष्टीने बघितले तर ज्यू हे निर्वासित आहे. पॅलेस्टाईन ही अरबांची मूळ भूमी आहे. त्यामुळे एखाद्या भाडेकरूने घरमालकाच्याच घरावर हक्क सांगावा आणि त्या घरमालकाला घरातून हुसकावून लावावे असला हा प्रकार आहे. या संघर्षामागील आणखी एक कारण म्हणजे जेरुसलेम शहर होय. हे शहर अरबांसाठी पवित्र आहे. कारण येथेच त्यांचे प्रेषित काही काळ राहून गेले होते. हे शहर सुद्धा इस्रायलने स्वतःच्या ताब्यात ठेवले असून या ठिकाणी लाखो ज्यूंच्या वसाहती तयार केल्या आहेत आणि या शहरात अरब म्हणजेच मुस्लिम औषधालाही राहणार नाही अशी तजवीज केली आहे. त्यामुळे हे शहर प्राप्त करण्याकरिता पूर्ण शक्तिनिशी ते लढत आहे. त्यामुळे कधीकाळी शांत असलेला मध्यपूर्व इस्रायलच्या निर्मितीनंतर युद्धाचा आखाडा बनला आहे.
**भारताची भूमिका काय ?** भारत स्वतंत्र झाल्यानंतर एका वर्षांनी इस्रायल स्वतंत्र झाला होता. मात्र भारताने तेव्हा त्याचे स्वतंत्र अस्तित्व मान्य केले नव्हते. खरंतर भारत हा इस्रायल निर्मितीच्या विरोधात होता. संयुक्त राष्ट्रात तर भारताने इस्रायलच्या विरोधात मतदानही केलं होतं. भारताने इस्रायलला समर्थन द्यावे याकरिता विविध स्तरातून मागणी होत होती. महान शास्त्रज्ञ अल्बर्ट आईन्स्टाईन यांनीही नेहरूंना या संदर्भात पत्र लिहिले होते. मात्र नेहरूंनी आईन्स्टाईनची विनंती अमान्य केली होती. गांधीजींनीही नोव्हेंबर 1938 मध्ये हरिजन मध्ये लिहिलेल्या लेखात पॅलेस्टाईनचे समर्थन केले होते. "ज्याप्रमाणे इंग्लंड इंग्रजांचा, फ्रान्स हा फ्रेंच लोकांचा त्याचप्रमाणे पॅलेस्टाईनवर अर्बनचा अधिकार आहे. त्यामुळे ज्यूंना अर्बनवर लादणे अतिशय चुकीचे आणि अमानवीय आहे. अरबांच्या मर्जीनुसारच त्या देशात ज्यू राहू शकतात." या शब्दात ते व्यक्त झाले होते. .
मात्र पुढील दोन वर्षात आंतरराष्ट्रीय पातळीवरील बदलत्या राजकीय संदर्भामुळे 1950 मध्ये भारताला इस्रायलला मान्यता द्यावी लागली. या संदर्भात 'इस्रायल हे नाकारता न येणारे सत्य आहे.' हे नेहरूंचे वाक्य बोलके आहे. भारताने इस्रायलला मान्यता दिली असली तरीही कोणतेही राजकीय संबंध प्रस्थापित केले नव्हते. कारण भारताचे अरब राष्ट्रांशी मैत्रीपूर्ण संबंध होते. या संबंधावर परिणाम होऊ नये ही त्यामागील भूमिका भारताची होती.
९० च्या दशकानंतर मात्र परिस्थिती बदलली. इस्रायल एक शक्तिशाली आणि तंत्रज्ञानात प्रगत देश म्हणून पुढे आला. इस्रायलकडून भारताला प्रगत कृषी तंत्रज्ञानासोबत लष्करी साहित्यही आवश्यक होते. त्यामुळे सहाजिकच भारताला इस्रायलची गरज भासू लागली. भारताचे अरब राष्ट्रांशी चांगले संबंध असूनही हे देश काश्मीर मुद्द्यावर सदैव भारत विरोधात राहिले होते. त्यांच्या या भूमिकेमुळेच भारताने इस्रायलसी राजनैतिक संबंध जोडले. असेही म्हणता येईल. आज रशियानंतर इस्रायल हा भारताचा सर्वात मोठा शस्त्र पुरवठा करणारा देश बनला आहे.
भारताचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर इस्रायलला पूर्ण पाठिंबा दिला आहे. तर काँग्रेसने पॅलेस्टाईन लोकांच्या स्वायत्ततेचा, मूलभूत अधिकारांचा आणि हक्कांच्या भूमीच्या प्रश्नाच्या पार्श्वभूमीवर पॅलेस्टाईनला पाठिंबा दर्शविला होता. बीजेपीने या मुद्द्यावर देशभर रान माजविल्यानंतर काँग्रेसला उपरती आली आणि त्यांनी तिसऱ्या दिवशी इस्रायलवरील हल्ल्याचा निषेध केला.



मोसादचे अपयश की धूर्त खेळी ?
इस्रायलची जगभरात नावाजलेली गुप्तचर संस्था मोसादला या दहशतवादी हल्ल्याची कल्पना नसावी. हे पटण्याजोगे नाही. त्यातच इस्रायलची आयर्न डोम प्रणाली ही जगातील सर्वोत्कृष्ट क्षेपणास्त्र प्रणाली आहे, जी कोणत्याही क्षेपणास्त्रांच्या हल्ल्यापासून संपूर्ण देशाचे रक्षण करू शकते. अशी प्रणाली दहशतवाद्यांनी डागलेले साधे रॉकेट रोखू शकली नाही. हे सुद्धा न पटण्याजोगे आहे. राष्ट्रीय सण साजरा करण्याकरिता बहुतांश सैन्य रजेवर जाणं हे सुद्धा अतार्किक आहे. त्यामुळे बेसावध असल्याचे भासवून हमासला हल्याची संधि द्यायची आणि प्रत्युत्तरात संपूर्ण हमास आणि गाझापट्टी नेस्तनाबूत करायची असा डावही यामागे इस्रायलचा असू शकतो.

# भिडे वाड्याचे राष्ट्रीय स्मारक व्हावे



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**महान समाज सुधारक महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले या दांपत्यांनी ज्या भिडे वाड्यात स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली त्या भिडे वाड्यासंदर्भात न्यायालयात दाखल असलेला खटला पुणे महानगर पालिकेने जिंकला असून आता तिथे राष्ट्रीय स्मारक होण्याचा मार्ग मोकळा आहे. भिडे वाडा ही ऐतिहासिक वास्तू आहे याच वास्तूतच १ जानेवारी १८४८ रोजी स्त्री शिक्षणाचा पाया रचला गेला मात्र हीच वास्तू न्यायालयाच्या कचाट्यात अडकल्याने या वास्तूची रया गेली होती. ज्या माऊलीमुळे स्त्रिया समाजात ताठ मानेने उभ्या आहेत. त्या माऊलीच्या पहिल्या शाळेची झालेली दुरवस्था पाहून मनाला यातना होत होत्या.**

आजही पुण्यात राहणाऱ्या अनेक लोकांना भिडे वाडा कोठे हे माहीत नाही ही शोकांतिका आहे. विशेष म्हणजे उच्च शिक्षित स्त्रिया आणि पुरुषांना देखील भिडे वाडा कोठे हे माहीत नाही. आज ही परिस्थिती असेल तर उद्या काय परिस्थिती असेल याचा विचारच करवत नाही म्हणूनच नवीन पिढीला फुले दाम्पत्यांच्या महान कार्याची ओळख व्हावी यासाठी भिडे वाड्यात राष्ट्रीय स्मारक व्हावे अशी मागणी अनेक सामाजिक आणि राजकीय संघटना करत होत्या. ज्या काळात स्त्री म्हणजे फक्त चूल आणि मूल अशी अवस्था होती. त्या काळात सावित्रीबाईंनी समाजाचे सर्व त्रास व छळ सहन करत अवितपणे आपले कार्य चालू ठेवले त्यामुळेच आज महिला पुरुषांच्या बरोबरीने उभ्या आहेत.
सावित्रीबाई आणि ज्योतिबा फुले यांच्या याच कार्याची नव्या पिढीला ओळख व्हावी यासाठी भिडे वाड्यात राष्ट्रीय स्मारक व्हावे यासाठी पुणे महानगर पालिकेने २१ फेब्रुवारी २००६ रोजी ठराव केला होता. भिडे वाड्याच्या दुरुस्तीसाठी पुणे महानगर पालिकेने त्यांच्या अंदाजपत्रकात तरतूदही केली होती इतकेच नाही तर महाविकास आघाडी सरकारच्या काळात सण २०१९ - २० च्या अंदाजपत्रकात दीड कोटींची तरतूद देखील करण्यात आली होती म्हणूनच माननीय न्यायालयाने या खटल्याचा निकाल लवकरात लवकर लावावा जेणेकरून भिडे वाड्यात फुले दाम्पत्यांच्या कार्यास साजेशे भव्यदिव्य राष्ट्रीय स्मारक उभे राहील अशी जनतेची अपेक्षा होती. ही अपेक्षा अखेर पूर्ण झाली न्यायालयाने पुणे महापालिकेच्या बाजूने निकाल दिला. हा निकाल स्वागतार्ह आहे. न्यायालयाच्या या निकालाचे राज्यातीलच नव्हे तर देशभरातील जनतेने स्वागत केले आहे. न्यायालयाने त्यांचे काम केले आहे आता सरकारने त्यांचे काम करावे. भिडे वाड्याच्या दुरुस्तीचे काम सरकारने तातडीने हाती घ्यावे. पुणे महानगर पालिका आणि सरकारने फुले दाम्पत्यांच्या कार्याला साजेशे भव्यदिव्य असे स्मारक लवकरात लवकर उभे करावे जेणे करून नवीन पिढीला फुले दाम्पत्यांच्या कार्याची ओळख होईल.



हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# फ्लाईंग क्लबमुळे वैमानिक होण्याचे स्वप्न साकार होणार : मुनगंटीवार

आधुनिक केसरी न्यूज



**चंद्रपूर :** चंद्रपूर आणि गडचिरोली या जिल्ह्यातील युवक-युवतींना वैमानिक होता यावे, यासाठी राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य, मत्स्यव्यवसाय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी पुढाकार घेतला आहे. विद्यार्थ्यांचे आकाशात उंच उडण्याचे स्वप्न प्रत्यक्षात साकारण्यासाठी चंद्रपूर येथे फ्लाईंग क्लब स्थापन करून विद्यार्थ्यांना प्रशिक्षित करण्यात येणार आहे. याबाबत पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी नियोजन भवन येथे कामाच्या प्रगतीचा आढावा घेतला.

प्रशिक्षणार्थी विमानाचे उड्डाण करण्यासाठी मोरवा येथील धावपट्टीच्या दुरुस्तीसाठी 5 कोटी 63 लक्ष तर संरक्षण भिंतीसाठी 11 कोटी 93 लक्ष रुपये तातडीने मंजूर करण्याच्या सूचना ना . मुनगंटीवार यांनी दिल्या आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाने येथील धावपट्टीचे कार्पेटिंग विमानाच्याच गतीने करावे, यात संबंधित यंत्रणेने विशेष लक्ष द्यावे. निवड करताना पहिल्या टप्प्यातील 10 प्रशिक्षणार्थ्यांमध्ये मागास प्रवर्गातील विद्यार्थी आणि विद्यार्थीनींचा समावेश आवर्जून करावा. तसेच केंद्र शासनाच्या कोल इंडिया, ओ.एन.जी.सी., इंडियन ऑईल, जे.एन.पी.टी., हिंदुजा, अदाणी, टाटा, बिरला आदी उद्योग समूहांच्या सामाजिक दायित्व निधीतून (सीएसआर फंड) विमानांची व्यवस्था करण्यात येईल. त्यासाठी तातडीने परीपूर्ण प्रस्ताव सादर करावा, अशा सूचना पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिल्या.

यावेळी सादरीकरण करताना जिल्हाधिकारी विनय गौडा म्हणाले, दुस-या टप्प्यात हँगरकरिता 10 कोटी, फ्रंट ऑफिसकरिता 37 लक्ष तर ॲप्रोच रोडकरीता 2 कोटी 50 लक्ष रुपयांची आवश्यकता आहे. तसेच एक इंजिन असलेली सेस्ना कंपनीची दोन विमाने आणि दोन इंजिन असलेले एक विमान घेण्यात येणार आहे.

नुकतेच नागपूर फ्लाईंग क्लबच्या सेस्ना – 172 आर. या चार आसनी विमानाचे मोरवा विमातनळावर प्रात्यक्षिक घेण्यात आले होते. या विमानाने टेक ऑफ, लँडिंग व हवाई मार्गात येणाऱ्या अडथळ्यांचे तसेच प्रशिक्षणासाठी इतर आवश्यक बाबींचे निरीक्षण केले. एखाद्या विद्यार्थ्याला वैमानिक होण्यासाठी 200 तास फ्लाईंग अवर्स पूर्ण करणे आवश्यक आहे. मात्र नागपूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळ येथे मोठ्या संख्येने होत असलेल्या विमानांच्या आवागमनामुळे वैमानिक प्रशिक्षणासाठी फ्लाईंग अवर्स पूर्ण होण्यास विलंब होतो. त्यामुळे पर्यायी ऑपरेशनल बेस म्हणून चंद्रपूरातील मोरवा विमानतळाचा पर्याय शोधण्यात आला आहे.

या बैठकीला जिल्हाधिकारी विनय गौडा, मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, सहाय्यक जिल्हाधिकारी मुरुगानंथम एम., कॅप्टन इझिलारसन व त्यांचे दोन सहकारी अभियंता सादत बेग आणि हरीश कश्यप आदी उपस्थित होते.

# सेंट्रल पार्क मेट्रो स्थानकाच्या नावामध्ये 'मुर्बी' गावाचा उल्लेख करावा : आ. प्रशांत ठाकूर

आधुनिक केसरी न्यूज

**पनवेल :** नवी मुंबईतील बेलापूर ते पेंधर मेट्रो रेल्वे उन्नत मार्गावरील 'सेंट्रल पार्क' मेट्रो स्थानक' या नावामध्ये 'मुर्बी' गावाचा उल्लेख करण्यासाठी तातडीने कार्यवाही करण्यात यावी, अशी आग्रही मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी आज सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक अनिल डिग्गीकर यांची मुंबईत भेट घेऊन केली. खारघर विभाग अंतर्गत मुर्बी हे जवळपास दहा हजार लोकवस्ती असणारे गाव पूर्वीपासूनच नावलौकिकास आहे.सिडको तर्फे 'नवी मुंबई मेट्रो' प्रकल्पांतर्गत बेलापूर ते पेंधर हा उन्नत मार्ग उभारण्यात आला आहे. एकूण ११ मेट्रो स्थानके उभारण्यात आली.तब्बल ११ पैकी ६ मेट्रो स्थानकाला स्थानिक गावांची नावे देण्यात आली.परंतू सेंट्रल पार्क मेट्रो स्थानकाला मुर्बी गावाचे नाव देण्याची मागणी तत्कालीन नगरसेवक अभिमन्यू पाटील यांनी दि. ०६ डिसेंबर २०२१ रोजी आमदार प्रशांत ठाकूर व सिडको प्रशासनाला निवेदनाद्वारे केली. त्या निवेदनाची दखल घेत आमदार प्रशांत ठाकूर यांनी सिडकोला पत्र दिले.

सिडकोने या संदर्भात चालढकलपणा केल्यामुळे नावात बदल झाला नाही. सिडकोच्या या मनमानी कारभाराला आमदार प्रशांत ठाकूर , तत्कालीन नगरसेवक अभिमन्यू पाटील व मुर्बी ग्रामस्थांनी विरोध केला, असून आपल्या गावाची अस्मिता जपण्यासाठी तसेच या स्टेशनला मुर्बी गाव स्टेशन असे नाव देण्यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांनी शुक्रवारी (दि. १३) झालेल्या लाक्षणिक उपोषणाला उपस्थित राहून ग्रामस्थांना पाठिंबा दिला होता.तसेच हा प्रश्न तातडीने मार्गी लावण्यासाठी सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक अनिल डिग्गीकर यांच्यासोबत चर्चा करणार असल्याचे आश्वासन ग्रामस्थांना दिले होते. त्या अनुषंगाने सोमवारी (दि. १६) आमदार प्रशांत ठाकूर यांनी सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक अनिल डिग्गीकर यांची निर्मल भवन येथे भेट घेऊन मुर्बी गावाचे नाव स्थानकाला देण्यासंदर्भात पुनर्मागणी करत तातडीने कार्यवाही करण्याची आग्रही मागणी केली तसेच मागणीचे स्मरण पत्रही दिले.

# मृत सीमा कडाळे यांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत मिळावी : आरपीआय

आधुनिक केसरी न्यूज

**निरा :** बारामती तालुक्यातील मोरगाव हद्दीत दि.२ ऑक्टोबर २०२३ रोजी एक अपघात घडला होता.या अपघातातून पळशी ता.बारामती येथील सिमा कडाळे ही व्यक्ती मृत झाली.त्या जेजूरी एमआयडीसी मधील एका कंपनीत रोजंदारीने कामास जात होत्या.त्या २ ऑक्टोबर रोजी संध्याकाळच्या दरम्यान कामावरून घरी परतत असताना ही घटना घडली अन त्यातच त्यांचं मृत्यू झाला होता.ज्या कंपनीत सदर महिला रोजंदारीने काम करत होती त्या कंपनीकडून त्यांच्या कुटूंबियांना आर्थिक मदत मिळावी. शिफारस करण्यात यावी.म्हणून रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया(ए) यांच्या वतीने मागणी करण्यात आलेली आहे.पुणे जिल्ह्याचे युवक उपाध्यक्ष अमोल साबळे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे,उपमुख्यमंत्री अजित पवार आणि कामगार मंत्री सुरेश खाडे यांना यासंदर्भातील पत्र पाठविले आहे. पत्रात असे म्हटले आहे की,दि.२ ऑक्टोबर २०२३ रोजी सायंकाळी ५ ते ६ च्या सुमारास शिवशंभोनगर,मोरगांव,ता. बारामती,जि.पुणे येथे गावचे हददीत मजूरी करून परत घराकडे येणा-या महिलांच्या टेम्पोला भरधाव वेगाने जाणा-या कारने धडक दिल्यामुळे झालेल्या अपघातात टेम्पो पल्टी होवून व त्याच टेम्पोखाली आल्याने जोरदार मार बसून नऊ महिलांपैकी सिमा कडाळे ही महिला मरण पावली. या सर्व महिला जेजुरी येथे जात या कंपनीमध्ये रोजंदारीने कामास जात होत्या. जाणे येणे करिता वाहन व्यवस्था नसल्यामुळे या महिलांना दररोज कामावर जाणेची व येणेची समस्या होती.त्यामुळे दिसेल त्या वाहनाला हात करुन या महिला वेळ प्रसंगी प्रवास करीत होत्या.सदर टेम्पोचालक हा त्यांचेच गावातील असल्यामुळे महिलांना मदत करण्याच्या हेतुने त्याने सदर महिलांना कामावरुन घरी परतत असताना टेम्पोमध्ये घेतले होते.सिमा कडाळे या गांव पळशी ता.बारामती जि.पुणे येथे पती व दोन मुलांसह रहात होत्या.दोन्ही मुले शिकत असून दोघे पतीपत्नी हे मजूरी काम करुन पोट भरणे तसेच मुलांचे शिक्षण इ.करीत होते.दोघेही मागास समाजातील आहेत व त्यांना शेती किंवा इतर स्थावर मालमत्ता नाही.हातावर पोट असल्यामुळे सिमा कडाळे यांच्या मृत्युने त्यांचे कुटूंबावर अचानक आघात झालेला आहे.सदर अपघाताबाबत वडगांव निंबाळकर पो.स्टेशनला गुन्हा नोंदवलेला असून सिमा कडाळे यांच्या मृत्युस जबाबदार असलेल्या व्यक्तीस जास्तीत जास्त शिक्षा होणे हे मानवतेच्या दृष्टीकोनातून गरजेचे आहे.




महाराष्ट्र Business Katta












# सर सय्यद अहमद खान




श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**सर सय्यद यांना इतिहास, राजकारण, पुरातत्त्वविद्या, पत्रकारी, साहित्य अशा अनेक विषयांमध्ये स्वारस्य होते. बरानीचे तारीख-इ-फिरोझशाही, अबुल फज्लची आइन-ए-अकबरी, जहांगीरचे तुझ्रुक हे ग्रंथ त्यांनी संपादिले. बायबलवर त्यांनी तबियिन-उल-कलाम हे भाष्य लिहिले. धर्मांच्या तौलनिक अभ्यासाचा हा पहिला प्रयत्न मानला जातो. १८५७च्या उठावानंतर त्यांनी लिहिलेले हिस्टरी ऑफ बिजनोर आणि हिस्टरी ऑफ दी रिव्होल्ट ऑफ बिजनोर हे त्यांचे ग्रंथही महत्त्वाचे आहेत. ब्रिटिशांच्या शिक्षणविषयक धोरणाचा लाभ हिंदूंनी करून घेतला. याउलट हे शिक्षण आम्हाला नको, असे ठामपणे सांगणारा, आठ हजार मौलवींनी सह्या केलेला एक अर्ज मुसलमानांनी ब्रिटिश सरकारला सादर केला.**

मुसलमानांचे धर्मांतर घडवून त्यांना ख्रिस्ती करणे, हा सरकारच्या इंग्रजी शिक्षणामागचा हेतू आहे, अशी त्यांची खात्री झाली होती. सय्यद साहेबांना मात्र शिक्षणसंस्था या आधुनिक इंग्रजी शिक्षणसंस्थांच्या धर्तीवर उभ्या केल्या जाव्यात, असे वाटत होते. इंग्रजी शिक्षणाला विरोध करून मुसलमान आपले नुकसान करून घेत आहेत, अशी त्यांची ठाम धारणा होती. आपले विचार मांडण्यासाठी त्यांनी फार्सी आणि इंग्रजी अशी दोन पत्रे काढली ती तहसीब-अल्-अखलाक आणि मोहमेडन सोशल रिफॉर्मर ही होत. तथापि कट्टरपंथीय मुस्लिम बांधवांनी काफिर व क्रिस्ताळलेला अशी विशेषणे देऊन त्यांच्यावर टीकचेच झोड उठवली होती. सर सय्यद अहमद खान हे विख्यात मुस्लिम विचारवंत, शिक्षणतज्ज्ञ व राजनीतिज्ञ होते. त्यांचा जन्म दि.१७ ऑक्टोबर १८१७ रोजी दिल्ली येथे झाला. त्यांचे पूर्वज हेरातचे होते. सम्राट अकबराच्या कारकीर्द- सन १५५६-१६०५मध्ये ते भारतात स्थलांतरित झाले आणि मोगलांच्या दरबारात निष्ठेने सेवा करू लागले. त्यांच्या पूर्वजांना मोगल दरबारातून मानाचे किताब मिळाले होते. सरांच्या वडिलांचे नाव सय्यद मुतक्की होते. मोगल दरबारात त्यांचे वजन होते. सय्यद अहमदांचे मातुल आजोबा ख्वाजा फरिदुर्शन अहमद हेही कर्तृत्ववान होते. मोगल दरबारात त्यांनाही सन्मान दिला जात होता. सर सय्यद यांना औपचारिक शिक्षण मिळालेले नव्हते. त्यांची आई हीच त्यांची पहिली गुरू होती. परोपकारी वृत्तीच्या या स्त्रीचा त्यांच्यावर खोल परिणाम झाला होता. पवित्र कुराण, गुलिस्ताँ, बोस्ताँ यांसारखे फार्सी ग्रंथ, काही अरबी ग्रंथ ते निरनिराळ्या व्यक्तींकडून शिकले. गणित आणि भूमिती यांचाही त्यांनी अभ्यास केला. मिर्झा गालिब यांच्यासारख्या थोर उर्दू कवीचा निकट सहवास त्यांना लाभला व त्यांच्या काव्याने ते प्रभावित झाले. स्वतःची लेखनशैली सुंदर असली पाहिजे, याची जाणीव त्यांना झाली. सन १८३८ साली त्यांच्या वडिलांचे निधन झाले. त्यानंतर त्यांनी मोगल दरबाराची सेवा करण्याऐवजी ईस्ट इंडिया कंपनीत काम करण्याचा निर्णय घेतला. या निर्णयाला त्यांच्या आप्तांनी विरोध केला तथापि हा विरोध भावनिक वृत्तीने केला जात होता, वास्तव वेगळेच होते. त्यांना त्याची स्पष्ट जाणीव होती. मोगल सम्राटाची आर्थिक परिस्थिती अत्यंत ओढगस्तीची झालेली होती. दरबाराचे नोकर-चाकर सांभाळणेही कठीण झाले होते. वडिलांच्या निधनानंतर आपल्या आईला निवृत्तिवेतनही दिले जात नाही, हे त्यांना दिसत होते. अशा परिस्थितीत मोगल दरबाराशी आपले भविष्य जोडणे, त्यांना योग्य वाटत नव्हते. ईस्ट इंडिया कंपनीत त्यांना नोकरी मिळाली आणि आग्रा येथे नायब मुन्शी या पदावर त्यांची नेमणूक झाली. सन १८४१मध्ये ते मैनपुरी येथे मुन्सफ झाले. ते मोगल दरबारची नोकरी करीत नसले, तरी मोगल दरबारकडून त्यांना सन १८४२मध्ये जवाद्-उद्-दौला अरिफ जंग हा किताब देण्यात आला. चार वर्षांत त्यांनी आपली बदली दिल्लीला करून घेतली. त्यांच्या वडीलबंधूंचे निधन झाल्यामुळे त्यांना दिल्लीत आपल्या आईच्या जवळ राहणे योग्य वाटत होते. त्या काळात त्यांची आर्थिक स्थिती बरी नसल्यामुळे त्यांनी पत्रकारिता आणि लेखन यांच्या आधारे आपल्या उत्पन्नात भर घालण्याचा प्रयत्न केला. त्यांचे वडीलबंधू एक



पत्र चालवीत असत, ते त्यांनी हाती घेतले. पण त्यात त्यांना यश आले नाही. बिजनोर येथे सद्र अमीन या पदावर सर सय्यद यांची सन १८५५मध्ये नेमणूक झाली. १८५७चा उठाव झाला, तेव्हा कंपनी सरकारशी एकनिष्ठ राहून त्यांनी अनेक इंग्रजांचे प्राण वाचवले. तथापि या उठावामुळे इंग्रज सरकार मुसलमानांकडे संशयाने पाहू लागले होते. त्यांच्या जवळच्या नातेवाईकांना, त्यांच्या आईलाही याची तीव झळ लागली. त्यामुळे देश सोडण्याचा विचारही त्यांच्या मनात येऊन गेला. परंतु अखेरीस या परिस्थितीचा विचार त्यांनी मुसलमानांच्या संदर्भात केला आणि इंग्रजी सत्तेशी जुळवून घेण्यातच मुसलमानांचे हित आहे, या निष्कर्षाप्रत ते आले. या उठावावर अस्बब-इ-बगावत-इ-हिंद हा ग्रंथ त्यांनी लिहिला. त्यात त्यांनी बंडाची कारणमीमांसा केली. ती करताना त्यांनी इंग्रजांवरही टीका केली. बंडवाल्यांना शिक्षा देताना त्यांनी दाखविलेल्या सूडबुद्धीचा निषेध केला व या बंडात हिंदूंपेक्षा मुसलमान जास्त पोळले गेले, असेही मत व्यक्त केले. ब्रिटिश काउन्सिलमध्ये भारतीयांना प्रतिनिधित्व नसल्यामुळे भारतीय जनमताचे प्रतिबिंब त्यात पडत नाही आणि ब्रिटिशांचेच नुकसान होते, असेही प्रतिपादन त्यांनी केले. त्यानंतर लॉयल मोहमेडन्स ऑफ इंडिया हे पुस्तक त्यांनी लिहिले. १८५७च्या बंडाला सर्व मुसलमानांचा पाठिंबा नव्हता, असे दाखवून देण्याचा प्रयत्न त्यांनी या ग्रंथात केला. ख्रिस्ती जमातीने जिच्याशी मैत्री करावी, अशी एकमेव जमात मुसलमानांची होय, असेही विचार त्यांनी या ग्रंथात मांडले. सन १८६७मध्ये त्यांची बदली बनारसला झाली. दोन वर्षांनी ते इंग्लंडला गेले. तेथे यूरोपीय संस्कृतीचे त्यांना दर्शन झाले. त्या संस्कृतीचा त्यांच्यावर प्रभाव पडला. इंग्लंडमधील वास्तव्यात त्यांना विख्यात स्कॉटिश साहित्यिक टॉमस कार्लाइल याचा स्नेहपूर्ण सहवास लाभला. प्रेषित मुहंमद पैगंबर यांच्या जीवनावर आणि त्यांनी लिहिलेल्या एसेज ऑफ दी लाइफ ऑफ मुहंमद या पुस्तकावरही त्यांची चर्चा झाली. ऑक्सफर्ड आणि केंब्रिज विद्यापीठांना त्यांनी भेट दिली. लंडनमध्ये दीड वर्षाहून अधिक काळ राहून सर सय्यद अहमद भारतात आले, ते अनेक शैक्षणिक योजना घेऊनच. सर सय्यद यांना ब्रिटिश सत्ता ही भारताला उपयुक्त आणि आवश्यक वाटत होती. ब्रिटिशांशी एकनिष्ठ राहण्यात भारतीयांचे कल्याण आहे, अशी त्यांची धारणा होती. इंडियन नॅशनल काँग्रेसला त्यांचा कडवा विरोध होता. काँग्रेसला शह देण्यासाठी त्यांनी इंडियन पॅट्रिऑटिक असो-सिएशन हा पक्ष काढला. मुस्लिमांमध्ये इंगजी शिक्षणाचा प्रसार झाला पाहिजे आणि पाश्चात्त्य शिक्षण त्यांनी घेतले पाहिजे, या आपल्या मतावर ते अखेरपर्यंत ठाम होते. हिंदू आणि मुसलमान ही दोन स्वतंत्र राष्ट्रे आहेत, अशी त्यांची कल्पना नव्हती, असे म्हणण्यास जागा आहे. त्यांच्या शैक्षणिक संस्थांत हिंदूंनाही प्रवेश होता. १८६१मध्ये व्हाइसरॉयच्या काउन्सिलमध्ये तीन हिंदूंचा समावेश केला होता. तथापि यांत मुसलमान का नाही? असा प्रश्न न करता त्यांनी समाधान व्यक्त केले होते. मात्र या एकतेबद्दल पुढे त्यांच्या मनात शंका निर्माण झाली होती, असे दिसते. त्यांनी उत्तर प्रदेशांतील अलीगढ येथे मोहमेडन अँग्लो-ओरिएंटल महाविद्यालय स्थापन केले. मुसलमान तरूणांना उदार, आधुनिक शिक्षण मिळावे, हा हेतू त्यामागे होता. या महाविद्यालयाचेच पुढे अलीगढ मुस्लिम विद्यापीठात रूपांतर झाले. नोकरीतून निवृत्त झाल्यानंतर त्यांनी पवित्र कुराणावर भाष्य लिहिण्यास आरंभ केला. सन १८७८मध्ये व्हाइसरॉयच्या लेजिस्लेटिव्ह काउन्सिलवर त्यांची नियुक्ती करण्यात आली. सन १८८३मध्ये अलीगढमध्ये त्यांनी मोहमेडन असोसिएशनची स्थापना केली. त्याचप्रमाणे त्यांनी मोहमेडन एज्यूकेशनल कॉन्फरन्सची स्थापना केली. मुसलमानांची सामाजिक आणि शैक्षणिक दृष्टी बदलावी, हे या संघटनेचे उद्दिष्ट होते. सन १८८७मध्ये लॉर्ड डफरिन यांनी त्यांना सिव्हिल सर्व्हिस कमिशनचे स्वीकृत सदस्य केले. एडिंबरो विद्यापीठाने त्यांना एल्.एल्.डी. ही सन्माननीय पदवी प्रदान केली. रॉयल एशियाटिक सोसायटी ऑफ ग्रेट ब्रिटनचे ते सन्माननीय सदस्य होते.

# भक्तांचे मनोरथ पूर्ण करणारी माता योगेश्वरी

आधुनिक केसरी

**हजारो वर्षांचा ऐतिहासिक वारसा जपत असलेल्या मनोहर अंबानगरीने आपली वेगळी ओळख ठेऊन सांस्कृतिक, ऐतिहासिक अध्यात्मिक, शैक्षणिक, पौराणिक, सामाजिक मुल्यांची जोपासना केली असुन अधुनिक काळातही ही मुल्ये जपण्याचे काम येथील सर्वधर्म समभाव जोपासणारा नागरीक करतो आहे. या भूमीला योगेश्वरी माता, साहित्य, संगीत, अध्यात्म असा तिहेरी संगम आपल्या लेखनातून प्रगट करणारे संतकवी दासोपंत, मराठी भाषेचे भगीरथ आद्यकवी मुकुंदराज, संत शिवकल्याण, कृष्णदयार्णव, बाबा महाराज सायगांवकर निझामाच्या जोखडातून मराठवाड्याला मुक्त करणारे पू.स्वामी रामानंद तीर्थ या महान विभुतीचा वारसा आहे.**

योगेश्वरी देवीचे योगेश्वरी सहस्त्रनाम या नावाचे स्त्रोत रुद्रयामल खंडाच्या बहुपाष्टंकात आहे. योगेश्वरी देवीचा उल्लेख असलेला दुसरा शिलालेख सिंघन यादवांचा सेनापती खोलेश्वर यांच्या कारकिर्दीतील शके ११५० मधील असून या शिलालेखामध्ये अंबाजोगाई या शहराची माहिती आहे. तर योगेश्वरी महात्म्य या पौराणिक ग्रंथातही या पुण्यभुमीची अत्यंत सखोल माहिती आहे.

योगेश्वरी देवीचा महिमा अपार आहे

योगेश्वरी देवी मंदीरात या देवीची कुमारिका अवस्थेतील पुजा असुन या देवीने कुमारिका राहण्याचे ठरविले या संबंधीची आख्यायिका श्रध्दाळु भाविकात सर्वश्रुत आहे ती म्हणजे योगेश्वरी देवीचा विवाह परळी येथील वैद्यनाथाशी ठरला होता परंतु हे स्थळ तिला पसंद नव्हते सर्वांच्या आग्रहास्तव ती विवाहास तयार झाली सर्व वऱ्हाडी परळी पासुनच्या काही अंतरावरील जयवंती नदीच्या काठावर असलेल्या शिवलेण्यात आले लग्नाचा मुहूर्त पहाटेचा होता वैद्यनाथही सजवलेल्या नंदीवर बसुन भुयारी मार्गाने हजर झाले. विवाह सोहळ्यांची तयारी सुरु झाली. देवी मात्र शांत होती शेवटी व्हायचे तेच झाले कोंबडा आरवला, मुहूर्त टळून गेला लग्न रहित झाले सर्व वऱ्हाडी दगड बनले आलेल्या भुयारातून वैद्यनाथ परळीकडे निघुन गेले देवीने जयवंती तिरावर राहण्याचा निर्णय घेतला दगड बनलेल्या परीसरास हत्तीखाना असे संबोधतात. योगेश्वरी देवी आजन्म कुमारिका राहिली यांचे दुःख माय बहिणींना आजही आहे. त्यांच्या आर्तमनाची गीते ऐकावयास मिळतात. महाराष्ट्रात व त्या बाहेर अंबाजोगाई स्थित योगेश्वरी देवीचे महात्म्य अनन्य साधारणआहे. अंबाजोगाई हे देवीचे मूळ स्थान आहे योगेश्वरी देवीने आपले हातात जी निरनिराळी आयुधे धार केलेली आहेत त्यात देवीने एका हातात पात्र (परडी) धारण केल्याचा उल्लेख रुद्रयामल ग्रंथातील देवी स्तवनाच्या श्लोकात केले आहे.

हे शक्तीपीठ असल्या कारणाने महाराष्ट्र आणि इतर ठिकाणाहून लाखो भक्तगण दर्शनासाठी येतात ग्रामीण भागातील लोक मातेला नवस बोलतात तो पुर्ण करण्यासाठी आश्विन व मार्गशीर्ष या



दोन उत्सवात मोठी यात्रा भरते भक्तगण,उपासक नऊ दिवस उपवास करून नवस पुर्ण करतात त्याच प्रमाणे वर्षभर मंगळवार व शुक्रवार देवी मंदीरात दर्शनासाठी गर्दी असते. देवल कमेटी मार्फत व्यवस्था पाहिली जाते.शासनाने लक्ष देऊन भक्तांसाठी अधिक सोयी व्हाव्यात अशी भाविकांची मागणी आहे. दंतासूर नावाचा एक राक्षस अंबानगरीत वास्तव्यास होता. तो महादेवाचा परम् भक्त होता. पण त्याला वेदशास्त्र व यज्ञकर्म पसंत नव्हती. त्यामुळे यज्ञकर्मात तो विघ्न आणीत असे. यज्ञकर्म बंद पडल्याने देवाला आहुती मिळेनाशी झाली. त्यामुळे भूतलावरील ऋषीमुनी स्वर्गातील इंद्र व ब्रह्मदेवाला भेटायला गेले. ब्रह्मदेवांनी सर्वांना येण्याचे कारण विचारले. विष्णू व महादेव यांना निवेदन सादर केले. नंतर सर्वांनी हात जोडून आदिमायेची प्रार्थना केली. प्रार्थना ऐकून योगेश्वरी देवी प्रकट झाली व भक्ताचे मनोरथ ओळखून तिने दंतासुराच्या वधासाठी जयवंतीनगरीच्या तिरावर अवतार धारण करीन,असे भक्तांना आश्वासन दिले. मार्गशीर्ष महिन्यात देवीने अवतार धारण केला योगेश्वरी देवीचा अवतार झाल्याचे ऐकून दंतासूर उद्विग्न झाला व देवीचा वध करण्यासाठी त्याने बलदंड दैत्यांना एकत्र जमवले व चतुरंग दलासह देवीवर चाल करून गेला. देवी दंतासुरासमोर युद्धासाठी उभी होती. युद्धास प्रारंभ झाला. दोन्ही सैन्यांत घनघोर युद्ध झाले. दंतासूर राक्षस हातात खड्ग घेऊन देवीचा वध करण्यासाठी तिच्यावर चाल करून गेला. त्याक्षणी देवीने दंतासुराचा दात पकडला व तो उपटून फेकून दिला. नंतर देवीने आपल्या हातातील खड्गाने त्याचे शरीर धडापासून वेगळे केले त्याचवेळी दंतासूर ठार झाला.

दंतासूराचा नाश झाल्याने चोहीकडे आनंदी आनंद झाला. दंतासूराच्या वधानंतर देवीने सर्वतिर्थाच्या दक्षिणेस आपले कायमचे वास्तव्य केले व आपल्या अवतार कार्याची खूण म्हणून दंतासुराचे मस्तक समोर धारण केले.दुष्ट लोकांचा नाश करण्यासाठी मर्दिनीने आपला अवतार धारण केला म्हणून तीला दंतासुर मर्दिनी संबोधले जाते. ज्या ठिकाणी तिने अवतार धारण केला ते ठिकाण जोगाई म्हणून प्रसिद्ध झाले आणि अंबा प्रगटली म्हणून अंबाजोगाई अशा या देवीचे नवरात्र घरोघरी मनोभावे होते देवीचे बल प्राप्त होण्यासाठी आपले मनोबल वाढवून देवीला अनन्यभावाने शरण जाऊन आत्मबलाचा उपयोग दुष्टांच्या संहारासाठी करावा व आपली उन्नती, प्रगती होते.हेच देवीदर्शनाचे,उपासनेचे महत्व आहे.

राहुल दि.देशपांडे
अंबाजोगाई, बीड

# दसरा मेळाव्यात शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे काय बोलणार ?

आधुनिक केसरी

शिवतीर्थावरील दसरा मेळावा कोणाचा यावरुन सीएम एकनाथ शिंदे यांची शिवसेना आणि उद्धव ठाकरे यांची शिवसेना पुन्हा एकदा समोरासमोर ठाकतील असे वाटत असतानाचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अर्ज मागे घेतल्याने निदान दसरा मेळावा पुरता वाद मिटला असे तूर्तास म्हणावयास हरकत नाही 30 ऑक्टोबर 1966 साली शिवसेनाप्रमुख स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांनी शिवाजी पार्कवर पहिला दसरा मेळावा घेतला होता. दसरा मेळावा आणि शिवाजी पार्क हे एक समीकरण बनलं. त्याला आता ५७ वर्षे पूर्ण होतील. इतकी वर्षे शिवाजी पार्कवर दसरा मेळावा घेणारा शिवसेना हा एकमेव पक्ष असेल अनेक राजकीय पक्षांकडून दसरा मेळाव्याचे आयोजन करण्यात येतं. पण एक पक्ष, एक नेता आणि एक मैदान हे शिवसेनेतच बघायला मिळत असल्याचं अनेक जाणकार सांगतात हिच खरी शिवसेनेची दसरा मेळाव्याची खासियत आहे यावेळी पक्षप्रमुख काय बोलतात याकडे सर्वांचेच लक्ष लागून राहिलेले असते या मेळाव्यास संपूर्ण महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून कार्यकर्ते येतं असतात शिवसेना या पक्षात भविष्यातली रुपरेखा, वाटचाल दसरा मेळाव्यात जाहीर केली जाते त्यामुळे आगामी काळात होवू घातलेल्या लोकसभा, विधानसभा, महापालिका निवडणुका तसेच आमदार अपात्रतेच्या पार्श्वभुमीवर शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे काय बोलतात याकडे राजकीय वर्तुळासह संपूर्ण महाराष्ट्र आणि दिल्लीचे लक्ष लागले आहे !

राजू जाधव,
मांगूर जि.बेळगांव



# राणी सावरगावचा प्राचीन वारसा व रेणुका देवी



डॉ.गणेश माने
संपर्क क्र. 9284489380

आधुनिक केसरी

**मराठवाड्यातील परभणी जिल्ह्याच्या दक्षिण सीमेलगत लातूर व नांदेड या दोन्ही जिल्ह्यांसिमेलगत राणीसावरगाव हे गाव वसलेले आहे.हा परिसर बालाघाटाच्या टेकड्यांनी व्यापलेला आहे. अशा या बालाघाटाच्या डोंगराळ भागात वसलेल्या राणीसावरगाव येथील रेणुका देवीचे मंदिर देवीच्या साडेतीन पीठांपैकी माहूर येथील रेणुका देवीच्या मुळ शक्ती पीठाचे ऊपशक्तीपीठ म्हणून गणले जाते असेआनेक इतिहास संशोधकाने मत व्यक्त केलं आहे. त्यामुळे नवरात्रोत्सवात दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी होते राणीसावरगाव येथे सुमारे ७०० वर्षापूर्वी बांधलेले देवीचे हेमाडपंथी मंदिर आहे**

विश्वस्त म्हणून गळाकाटू कुटूंबातील वंशज काम पाहतात.यावर्षी १० आक्टोबर पासून नवरात्रोत्सवाला प्रारंभ झाला आहे.गावातील प्रत्येक घरात घटस्थापना करून नऊ दिवस उपवास केले जातात.माहूर व तुळजापूरच्या देवीचे ठाण म्हणून येथील रेणुका देवीची भक्तीभावे आराधना केली जाते.

**प्रसिध्द तीर्थक्षेत्र :** गंगाखेड तालुक्यातील राणीसावरगाव येथील रेणुका माता मंदिर हे प्रसिध्द तीर्थक्षेत्र आहे. गंगाखेड- अहमदपूर रोडवर हे गंगाखेड पासून २० किलोमीटर अंतरावर आहे. गोमती नदीच्या निसर्गरम्य परिसरात हे तीर्थक्षेत्र वसलेले आहे. हेमाद्री पंथाच्या शैलीत बांधलेले हे एक प्राचीन मंदिर आहे. श्री रेणुका माता हे माहूरगडचे ठाणे समजले जाते. हे पुरातन काळापासून तीर्थक्षेत्र म्हणून परिचित आहे. पुरातत्व खात्यालाही इथे प्राचीन जैन काळातील काही नोंदी व मंदिरे सापडली आहेत. श्री रेणुका माता मंदिराच्या परिसरात काही अंतरावर तीर्थकार अदिनाथ मंदिर, श्री दत्त मंदिर, श्री विठ्ठल मंदिर, श्री मूळपीठ भवानी मंदिर, श्री नीळकंठेश्वर मंदिर, शंभु महादेव मंदिर, केदारेश्वर मंदिर, श्री मातंग देवी मंदिर अशी अनेक मंदिरे आहेत. इथे संपूर्ण महाराष्ट्रासह आंध्रप्रदेश, कर्नाटकमधून भाविक-भक्त मोठ्या श्रध्देनं हजेरी लावतात. जागृत देवस्थान असल्यामुळे मंदिराविषयी अनेक आख्यायिका आणि चमत्कार सांगितले जातात. मूळपीठ, कल्लोळ तीर्थ, श्री योगी मुळपुरूष गोविंदराव गळाकाटू समाधीस्थान, नगरखाना ही भक्तांसाठी श्रध्देची ठिकाणे आहेत. मंदिरापासून केवळ दीड किलोमीटर अंतरावर असलेले खंडोबाचे जागृत मंदिर हे प्राचीन व हेमाडपंथी आहे. तिथेही पौर्णिमला दरवर्षी यात्रा भरते. श्री रेणुका मातेची दररोज सकाळी ठीक ६:०० वाजता श्री.देवीची मुखवस्त्र काढली जातात. सकाळी ६ ते ९ दर्शनाची वेळ असते. दुपारी १:०० वाजता पूजा, आरती, नैवद्य दाखविला जातो. तर रात्री ठीक ९:०० वाजता देवीस मुखवस्त्र व पांघरूण घातले जाते. श्री रेणुका माता मंदिर हे निसर्गाच्या सानिध्यात डोंगर माथ्यावर उभं असलेलं परभणी जिल्ह्यातलं एकमेव तीर्थक्षेत्र आहे.

राणीसावरगाव येथील रेणुका देवी संस्थानचे विश्वस्त भोपी यांच्या हस्ते पंचामृत अभिषेक, परशुराम याग, महानैवेद्य चढवून सकाळी १० वाजता महाआरती करण्यात येते. अक्षय तृतीयेच्या शुभमुहूर्तावर श्री रेणुका माता मंदिरात आंब्याची आरास करण्यात आली होती. यावेळी हजारो भाविकांनी उपस्थिती लावत श्री रेणुका माता आणि श्री परशुरामाचे दर्शन घेतले.

**१) देवीचे दर्शन होणार सुकर : –**
साडेतीन शक्तीपीठांपैकी मुख्य मूळ पीठ असलेल्या श्री रेणुका माता ही माहूर येथील देवीचे उप शक्तीपीठ आहे. राणीसावरगाव येथील रेणुका देवीचे दर्शन घेण्यासाठी महाराष्ट्रातून तसेच जगभरातून भाविक येतात. त्यामुळे येथे येणाऱ्या भाविकांना, वयोवृद्धांना मंदिराच्या दक्षिणेकडील भागात तीर्थ कल्लोळ आहे. येथे पाय धुण्यासाठी किंवा अंघोळ करताना भाविकांवर आर्थिक भार टाकला जातो. रोप-वे झाल्यानंतर रेणुका देवीचे दर्शन घेणे सोपे होईल. भाविकांनीही लवकरात लवकर रोप-वे बसवण्याची मागणी केली आहे.

**२) विदेशी पाहुण्यांची हजेरी:**
राणीसावरगाव येथे अनेक विदेशी पाहुण्यांनी हजेरी लावली. विदेशी पाहुण्यांनी श्री रेणुका देवी मातेचे दर्शन घेतले. ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, ग्रीस, मलेशिया, दक्षिण आफ्रिका, इंग्लंड, पोलंड या देशातून जवळपास चाळीस विदेशी पाहुणे माहूर गडावर आले होते.तेव्हं याच रेणूका देवीच्या ऊपशक्ती पिठ आसलेल्या राणीसावरगाव येथील देवीच्या दर्शनासाठी आले होते. त्यांनी मातेच्या दरबारात जोगवा,गोंधळ घातला. याचा ऐतिहासिक पुरावा यु.म.पठाण वी भी कोलते या इतिहास संशोधकाने उपलब्ध



साधनांच्या सहाय्याने सिद्द केले आहे.ते पाहून भाविक मंत्रमुग्ध झाले होते. दरम्यान विश्वस्त गोविंदराव गळाकाटू,,भोपी, विश्वस्त, व्यवस्थापक यांनी पाहुणे विदेशी पाहुण्यांचे स्वागत केले होते. विदेशी पाहुणे दर्शनासाठी आल्याने राणीसावरगाव परिसरातील नागरिकांनी पाहुण्यांना पाहण्यासाठी प्रचंड अशी गर्दी केली होती.

**३) विदेशी पाहुण्यांनी जाणले राणीसावरगावचे महात्म्य :** परिसरातील बालाघाटाच्या गडावरील नयनरम्य दृश्य पाहून विदेशी पाहुण्यांनी आनंद उत्सव सादरा केला. नवरात्राचे महत्व विदेशी पाहुण्यांना सांगण्यात आले. वि.भि कोलते या इतिहास संशोधकाने गाईडने या भागाची माहिती त्यांना त्यांच्या भाषेत ट्रान्सलेट करून दिली. गडाला एक महान तीर्थक्षेत्र व महाराष्ट्रातील साडेतीन शक्तीपीठांपैकी प्रमुख शक्तीपीठ असलेल्या माहूर येथील रेणुका देवीचे ऊपशक्तीपिठ म्हणून स्थान निश्चित मानले जाते. राणीसावरगाव या शहराला चहूबाजूंनी बालाघाटाच्या डोंगरांनी आणि घनदाट जंगलांनी वेढलेले आहे.

**४) चोख बंदोबस्त :-**
राणीसावरगाव येथे नवरात्र महोत्सव दर वर्षी घटस्थापना करून सुरुवात केली जाते . घटस्थापनेच्या नंतर नऊदिवस यात्रा भरते.या नऊदिवसाच्या काळात देवीच्या दर्शनासाठी भाविकांची प्रचंड गर्दी असते. ही गर्दीची संख्या लक्षात घेता पोलीस प्रशासनाने चोख बंदोबस्त लावला आहे. श्री चुडामुनी महाराजांची पालखी अहमदपूर येथून राणीसावरगाव येथे येते.या पालखी सोहळ्यात ३ ते ४ हजार भाविकांचा सहभाग असतो. राणीसावरगाव येथे यावर्षी भरगच्च धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. दररोज रात्री आरती घेऊन श्रींच्या नावाने प्रसाद वाटप केला जातो.आष्टमीला होमहवन केले जाते. दसऱ्याच्या दिवशी सिमोल्लंघनात पालखी मिरवणूक काढली जाते.सर्व गावकरी पालखी सोबत माळावरील मूळ पीठ असलेल्या देवी मंदिरात जमतात.

**५) रावण दहनाचा कार्यक्रम :-**
या ठिकाणी रावण दहनाचा कार्यक्रम होतो. राणीसावरगाव येथे नवरात्रोत्सव काळात भाविकांची संख्या दररोज वाढत आहे. गर्दीचा फायदा घेऊन भुरट्या चोरट्यांनी चोरय. होण्याची शक्यता असते. तेव्हा पोलीस प्रशासनाने मंदिर परिसरात चोख पोलीस बंदोबस्त ठेवला आहे. दर्शनासाठी भाविकांच्या रांगा लागत असून, या ठिकाणीही पोलीस प्रशासन नजर ठेवून आहे

डोंगराळ भागात वसलेल्या राणीसावरगाव येथील रेणुका देवीचे मंदिर देवींच्या साडेतीन पीठांपैकी ऊपशक्ती पीठ म्हणून गणले जाते. त्यामुळे नवरात्रोत्सवात दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी होते.राणीसावरगाव येथे सुमारे ७०० वर्षापूर्वी बांधलेले देवीचे हेमाडपंथी मंदिर आहे. विश्वस्त म्हणून गळाकाटू कुटूंबातील वंशज काम पाहतात.. यावर्षी १० आक्टोबरपासून नवरात्रोत्सवाला प्रारंभ झाला आहे. गावातील प्रत्येक घरात घटस्थापना करून नऊ दिवस उपवास केले जातात.माहूर व तुळजापूरच्या देवीचे ठाण म्हणून येथील रेणुका देवीची भक्तीभावे आराधना केली जाते.माहूर, तुळजापूरला जाणारे भाविक आवर्जून राणीसावरगाव येथे येऊन दर्शन घेतात.नवसाला पावणारी देवी अशी या देवीची अख्यायिका आहे.नवरात्र उत्सव काळात लातूर, नांदेड, परभणी आणि शेजारील आंध्रप्रदेश, कर्नाटक राज्यातून भाविक राणीसावरगाव येथे दाखल होतात.भाविकांची संख्या लक्षात घेता पोलीस प्रशासनाने चोख बंदोबस्त लावला आहे. श्री चुडामुनी महाराजांची पालखी अहमदपूर येथून राणीसावरगाव येथे येते.या पालखी सोहळ्यात ३ ते ४ हजार भाविकांचा सहभाग असतो.राणीसावरगाव येथे यावर्षी भरगच्च धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले आहे.दररोज रात्री आरती होते.श्रींच्या नावाने प्रसाद वाटप केला जातो.आष्टमीला होमहवन केले जाते.दसऱ्याच्या दिवशी सिमोल्लंघनात पालखी मिरवणूक काढली जाते.सर्व गावकरी पालखी सोबत माळावरील मूळ पीठ असलेल्या देवी मंदिरात जमतात.या ठिकाणी रावण दहनाचा कार्यक्रम होतो.पोलिसांचा चोख बंदोबस्त राणीसावरगाव येथे नवरात्रोत्सव काळात भाविकांची संख्या दररोज वाढत आहे.गर्दीचा फायदा घेऊन भुरट्या चोया होण्याची शक्यता असते. तेव्हा पोलीस प्रशासनाने मंदिर परिसरात चोख पोलीस बंदोबस्त ठेवला आहे.दर्शनासाठी भाविकांच्या रांगा लागत असून, या ठिकाणीही पोलीस प्रशासन नजर ठेवून आहे.

# सुचित्रा सेन यांनी राज कपूर यांच्या चित्रपटातील भूमिका नाकारली होती

आधुनिक केसरी

**प्रख्यात बंगाली अभिनेत्री सुचित्रा सेन यांनी १९५० ते १९७० या काळात मुख्यत्वे बंगाली चित्रपटसृष्टीतच अभिनयाची कारकीर्द केली. अमेरिकेच्या (हॉलिवूड) चित्रपट अभिनेत्रींप्रमाणेच पडद्याबाहेर त्या चित्रपटाच्या झगमगाटापासून दूर राहात असल्याने त्यांची ग्रेटा गार्बो या अमेरिकी अभिनेत्रीशी तुलना केली जात असे. सुचित्रा सेन यांनी सहा हिंदी चित्रपटांमधे भूमिका केल्या होत्या. पण त्यांचे एक वैशिष्ट्य म्हणजे चित्रपट कोणत्याही भाषेतील असला तरी आपली भूमिका निवडण्याबाबत त्या अतिशय चोखंदळ होत्या. बंगाली चित्रपटसृष्टीचे भीष्माचार्य निर्माते-दिग्दर्शक सत्यजीत राय यांच्या चित्रपटात भूमिका करण्यास सुचित्रा सेन यांनी नकार दिला होता.**

त्याचे कारण असे होते, की सुचित्रा सेन आपल्या चित्रपटात भूमिका करीत असताना त्यांनी अन्य कोणत्याही चित्रपटात काम करता कामा नये, अशी सत्यजीत राय यांची अट होती. सुचित्रा सेन यांना हे मान्य होणे शक्यच नव्हते ; कारण अन्य चित्रपटही त्यांच्या हातात होते.



सुचित्रा सेन यांनी हिंदी भाषेतील `देवदास' (१९५५: दिलीप कुमार), `चंपाकली' (१९५७: भारत भूषण), `बंबई का बाबू' (१९६०: देव आनंद), `सरहद' (१९६०: देव आनंद), `ममता' (१९६६: अशोक कुमार) आणि `आंधी' (१९७५: संजीव कुमार) या सहाच चित्रपटांमधे भूमिका केल्या. या चित्रपटांमधील जे. ओम प्रकाशनिर्मित आणि गुलजारदिग्दर्शित `आंधी' या चित्रपटातील आरती देवीची भूमिका सर्वाधिक गाजली. त्या भूमिकेवर दिवंगत पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव होता. सुचित्रा सेन यांनी हिंदी चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेते-निर्माते-दिग्दर्शक राज कपूर यांच्या एका चित्रपटातील भूमिका स्वीकारण्यास स्पष्ट नकार दिला होता, याची अनेकांना कल्पना नसेल. बंगाली लेखक अमिताव चौधरी यांनी लिहिलेल्या `आमार बंदू सुचित्रा सेन' या पुस्तकासंदर्भात त्यांच्याशी बोलताना सुचित्रा सेन म्हणाल्या, की मला राज कपूर यांचे वागणे पसंत पडले नाही. मी पुरुषांमधे सौंदर्य पाहात नाही तर बुद्धिमत्ता आणि धारदार संभाषणाची कला पाहते. राज कपूर यांनी मला त्यांच्या चित्रपटात देऊ केलेली भूमिका मी तात्काळ नाकारली. ते त्यांच्या एका चित्रपटातील नायिकेची भूमिका घेऊन माझ्या निवासस्थानी आले. मी माझ्या जागेवर बसताच ते अचानकपणे माझ्या पायाजवळ येऊन बसले आणि त्यांनी भूमिकेबरोबरच गुलाबपुष्पांचा गुच्छ मला देऊ केला. मी त्वरित ती भूमिका नाकारली. मला अशा पद्धतीचे वागणे अजिबात आवडत नाही. ज्या पद्धतीने ते माझ्या पायाजवळ येऊन बसले ते एखाद्या पुरुषाला शोभत नाही.

त्याच पुस्तकात सुचित्रा सेन यांनी असेही नमूद केले आहे, की `आंधी' या चित्रपटाच्या निर्मितीच्या काळात माझे सहकलावंत संजीव कुमार यांच्याशी माझी चांगली मैत्री जमली होती. संजीव कुमार हे अतिशय चांगले गृहस्थ होते, तसेच ते एक अव्वल कलावंतही होते. ते जेव्हा जेव्हा कोलकत्यात येत तेव्हा तेव्हा माझ्याशी संपर्क साधून माझ्या निवासस्थानी येत असत. `आंधी' हा सुचित्रा सेन यांच्या अखेरच्या चित्रपटांपैकी एक होता. १९७६ साली त्यांनी `दत्ता' या चित्रपटात तर १९७८ साली `प्रणय पाशा' चित्रपटात अशा दोन बंगाली चित्रपटांमधे भूमिका केल्या. सुचित्रा सेन यांचे १७ जानेवारी, २०१४ या दिवशी कोलकत्यात निधन झाले.

अनिल रा. तोरणे,
९२२६१६०६५४)

# आनंदी जीवन जगावे कसे ?

आधुनिक केसरी

दैनंदिन जीवन जगताना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते.कधी, कोठून,कोणती समस्या तोंड वर काढेल यांचा नेम नसतो.त्यामुळे मानवी जीवनातला आनंद हळूहळू कमी होऊ लागला आहे.असे असले तरीही दुःखामुळे हताश व निराश न होता आनंदी जीवन जगता येते.फक्त आनंद शोधण्याची शोधक दृष्टी तुमच्याकडे असली पाहिजे.

भल्या पहाटेला झोपेतून जागे होणे,आळस झटकून अंथरूण सोडणे,प्रातःविधी उरकून व मुखमार्जन करुन सकाळी सकाळी मोकळ्या मैदानात फिरायला जाणे म्हणजे जीवनातील सर्वोत्तम आनंद लुटण्यासारखे आहे.सकाळचा तो आल्हाद दायक शीतल गारवा अंगाला झोंबला की एक प्रकारची तरतरी येते.सकाळच्या थंडगार वातावरणातला बावनकशी सोन्यासारखा शुद्ध ऑक्सिजन श्वासावाटे शरीरात गेला की उष्ण शरीर गार व्हायला लागते आणि शरीर उर्जामय बनते.हा अनुभव मनाला एक विलक्षण आनंद देऊन जातो.अशा प्रसन्न सकाळी मोकळ्या वातावरणात योगा करताना,आणि फिरता फिरता मित्रांसंगे मनसोक्त गप्पा मारताना, हास्य विनोद करताना जो कधी न अनुभवलेला आगळावेगळा आनंद मिळतो त्याचे मोजमाप कशातच करता येत नाही.वयाची साठी ओलांडल्या नंतरही दररोज फिरायला जाणे आणि आपले आरोग्य कायमचे जपणे ही बाब नक्कीच आनंददायी असते. सकाळची मॉर्निंग वॉक संपवून घराकडे परत येताना पुर्व दिशेला उगवणारा तांबूस रंगाचा भला मोठा सूर्य पाहिला आणि सुर्याच्या सोनेरी किरणांनी सोनेरी झालेली सृष्टी पाहिली की डोळ्यांचे पारणे फिटते.



घरी गेल्यावर फिरुन आल्याचा आनंद चेहऱ्यावरुन ओसंडून वाहत असतो. बाथरुममध्ये जाऊन आवडीचे गाणे गुणगुणत गार गार पाण्याने आंघोळ करण्याचा आनंद आगळावेगळा तर असतो परंतु तितकाच निकोप जीवन जगण्यासाठी आवश्यक असतो. सगळं आवरून शाळेत गेल्यावर शिक्षक या नात्याने विद्यार्थ्यांचे चेहरे वाचताना व विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व अभ्यासताना एक निरागस आनंद मिळतो.आमच्या शाळेतील विद्यार्थी परिपाठात साने गुरुजी लिखित'खरा तो एकची धर्म' ही प्रार्थना किंवा 'माणसाने माणसाशी माणसासम वागणे' ही प्रार्थना लयबद्ध सुरात गातात तेव्हा ती प्रार्थना ऐकून मन प्रसन्न होऊन जाते आणि दिवसभर अध्यापन करताना जराही आळस येत नाही. प्रत्यक्ष वर्गात गेल्यावर आपल्या विषयाचे प्रभावी व विद्यार्थ्यांना लवकर आकलन होणारे अध्यापन करताना आणि विद्यार्थी जेव्हा एकाग्रतेने अध्यापन ऐकतात व पाठाचा आशय रसग्रहण करतात तेव्हा अध्ययन अध्यापन प्रभावी झाल्याचा आनंद दुसरीकडे कोठेही मिळत नाही.

आपण जो पेशा स्वीकारला त्याला योग्य न्याय देता आला पाहिजे. आपण आपले कर्तव्य काटेकोरपणे बजावले पाहिजे. आपले सहकारी वेळेवर येतात न येतात,वेळेवर आपापले काम करतात न करतात हे पाहत बसण्यापेक्षा आपण नोकरीच्या ठिकाणी वेळेच्या अगोदर जायचे, नेमून दिलेले काम नीटपणे करायचे,कार्यालय प्रमुखाने दिलेली जबाबदारी चोखपणे पार पाडायची.असे दररोज केल्यावर जो आनंद मिळतो त्याचे वर्णन सुध्दा करता येणार नाही.रोजचे रुटीन जीवन जगताना व तेच तेच काम करताना जीवन निरस होऊन जाते.थोडा बदल म्हणून सुट्टीत आपल्या मूळ गावी जाऊन आईवडिलांना,भावाबहिणींना व इतर नातेवाईकांना भेटले की, त्यांच्यासोबत मनमोकळ्या गप्पा मारल्या की आणि त्यांच्या सोबत बसून चार घास खाल्ले की ते सगळे आनंदीत होतात. बालमित्रांना भेटून दोन चार विनोद सांगून हसविले आणि बसस्टॉपवर असलेल्या हॉटेलमध्ये जाऊन मित्रांसंगे चहाचे घोट घेतले की आनंदाचा गोडवा वाढत जातो. आपणाला स्वतःसाठी व आपल्या कुटुंबासाठी आनंदाने जीवन जगता आले की जीवनाचे नंदनवन व्हायला वेळ लागणार नाही.आणि मग 'आनंदी आनंद गडे,जिकडे तिकडे चोहिकडे'याची प्रचिती आल्याशिवाय राहणार नाही. तेव्हा मनसोक्त जगा,आनंदी राहा,आणि आपल्यामुळे इतरांनाही जीवन जगण्याचा आनंद मिळेल असे व्यवहार ठेवा आणि निकोप आनंदासाठी आपले वर्तन प्रामाणिक ठेवा.

बबन दामोदर गुळवे
९७३०९३९७३२.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांवर चालण्याचा संकल्प करा

## पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** 'नागपूर आणि चंद्रपूर हा परिसर जगात 'टायगर कॅपीटल' म्हणून ओळखला जात असला तरी या दोन्ही जिल्ह्यांत बाबासाहेबांनी 1956 सालीच वाघाची डरकाळी दिली आणि संपूर्ण देशाने ही डरकाळी ऐकली आहे. या महामानवाने दिलेल्या संविधानात स्वातंत्र्य, अधिकार, जबाबदारी आणि कर्तव्याचाही समावेश आहे. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने संविधान वाचून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या विचारांवर चालण्याचा संकल्प करावा व त्यातून जगण्याची प्रेरणा घ्यावी,' असे आवाहन राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य, मत्स्यव्यवसाय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मेमोरीअल ट्रस्टच्यावतीने दीक्षाभूमी चंद्रपूर येथे आयोजित कार्यक्रमात त्यांनी महामानवाला अभिवादन केले. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ट्रस्टचे अध्यक्ष अरुण घोटेकर होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून सर्वश्री आमदार सुधाकर अडबाले, किशोर जोरगेवार, सुभाष धोटे, प्रतिभा धानोरकर, संस्थेचे उपाध्यक्ष अशोक घोटेकर, सचिव वामनराव मोडक, गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. प्रशांत बोकारे आदी उपस्थित होते. देशात आज 750 पेक्षा जास्त जिल्हे आहेत, मात्र नागपूर आणि चंद्रपूर या दोन जिल्ह्यांचे विशेष महत्त्व आहे, असे सांगून पालकमंत्री श्री. मुनगंटीवार म्हणाले, '14 ऑक्टोबर रोजी नागपूर येथे तर दोन दिवसांनी म्हणजे 16 ऑक्टोबर 1956 रोजी चंद्रपूर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या अनुयायांना बौद्ध धर्माची दीक्षा दिली. हे दोन्ही जिल्हे आज वाघांसाठी प्रसिद्ध आहेत. पण 1956 मध्येच बाबासाहेबांची डरकाळी संपूर्ण देशाने ऐकली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या संविधानानुसारच देशाची आणि राज्याची वाटचाल सुरू आहे. संविधानात प्रत्येक गोष्टीचा उल्लेख त्यांनी केला आहे. व्यक्ती स्वातंत्र्य, अधिकार यासोबतच प्रत्येकाला त्याच्या



जबाबदारीची आणि कर्तव्याचीसुध्दा जाणीव करून देण्यात आली आहे. त्यामुळे बाबासाहेबांचे केवळ स्मरण करून थांबू नये तर, त्यांच्या विचारांवर अंमल करावे लागेल. आणि त्यासाठी प्रत्येकाला संविधानाचे वाचनही करावे लागेल.' 'भगवान गौतम बुध्द, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ भारतापुरतेच मर्यादीत नाही तर संपूर्ण जगाला वैचारीक प्रेरणा देण्याचे कार्य त्यांनी केले आहे. 'शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा' हा जीवन जगण्याचा मंत्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्याला दिला आहे. गौतम बुद्धांचा शांततेचा आणि समतेचा संदेश संपूर्ण जगात पोहचला आहे. केंद्र शासन आज बुद्धगया, नालंदा, विक्रमशिला, सारनाथ, कपिलवस्तू, राजगीर, वैशाली, श्रावस्ती या ठिकाणांना जोडणारे बुद्ध सर्किट तयार करीत आहे,' असेही पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी सांगितले.

कौशल्य विकासावर आधारीत प्रशिक्षण आणि रोजगारासाठी चंद्रपूरमध्ये एस.एन.डी.टी विद्यापीठाचे उपकेंद्र स्थापन करण्यात येत आहे. तसेच आगामी काही महिन्यातच चंद्रपूर येथे फ्लाईंग क्लब सुरू करण्याचे नियोजन आहे. त्यामुळे चंद्रपूर आणि गडचिरोली या जिल्ह्यातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागास प्रवर्ग आदी विद्यार्थी–विद्यार्थीनींसाठी या बाबी गेमचेंजर ठरणार आहेत, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.



# महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ तालुका निवड समिती अध्यक्षपदी गजानन दांगटे

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** राज्यातील प्रमुख पत्रकार संघटने पैकी एक असलेली महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या तालुका निवड समिती अध्यक्षपदी येथील युवा पत्रकार गजानन दांगटे यांची सर्वानुमते निवड करण्यात आल्याची घोषणा जिल्हाध्यक्ष संग्राम मोरे यांनी केली. त्यांच्या निवडीबद्दल महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ लोह्याच्या वतीने आनंद व्यक्त करण्यात आला.

राज्यात प्रमुख पत्रकार संघापैकी एक असलेली महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाची बैठक मंगळवारी दि. १७ रोजी शहरातील शासकीय विश्रामगृहात पार पडली. सदरील बैठकीच्या अध्यक्षस्थानी पत्रकार संघ निवड समिती जिल्हाध्यक्ष मोहन पाटील पवार तर प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा उपाध्यक्ष सुनील पाटील चव्हाण होते. प्रारंभी मराठी पत्रकारीतेचे जनक बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून बैठकीस प्रारंभ करण्यात आला. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे, कार्याध्यक्ष संजय भोकरे, सरचिटणीस विश्वास अरोटे, निवड समिती जिल्हाध्यक्ष मोहन पाटील पवार, जिल्हा उपाध्यक्ष सुनील पाटील चव्हाण, जिल्हा कार्यकारिणी सदस्य गणपत पाटील जमागे यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या निवड समिती तालुकाध्यक्ष पदी गजानन दांगटे यांची निवड करण्यात आली. याप्रसंगी दांगटे यांचे लोहा पत्रकार संघाच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी मोहन पाटील पवार सह सुनील पाटील चव्हाण, जेष्ठ पत्रकार सुरेश महाबळे, प्रदीप कांबळे, अंबादास पाटील पवार, संग्राम चव्हाण, संतोष तोंडारे, विश्वनाथ शिंदे, शिवाजी मुंडे सह बहुसंख्य पत्रकार बांधवांची उपस्थिती होती.

# शिवा संघटनेची केंद्रीय ओबीसी आयोगापुढे मुंबईत सुनावणी संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** दिनांक १७ ऑक्टोबर २०२३ रोजी सह्याद्री विश्रामगगृह मुबंई येथे राष्ट्रीय मागासवर्गीय आयोग नवी दिल्लीचे अध्यक्ष हंसराज भय्या अहिर यांच्या अध्यक्षतेखाली शिवा संघटनेच्या ओबीसी आरक्षणाबाबत सुनावणी संपन्न झाली.या सुनावणीत वीरशैव-लिंगायत समाजातील लिंगायत वाणी जातीसह एकूण १५ उपजातीचा केंद्रीय ओबीसी लिस्ट मध्ये समावेश करण्यासाठी प्रा. मनोहर धोंडे यांनी आयोगापुढे मांडणी केली.या सुनावणीत केंद्रीय ओबीसी आयोगाचे प्रधान सचिव राजीव रंजन, सदस्य भुवन भूषण कमल, केंद्रीय आयोगाचे आर्चीव्हस राजेश कुमार, राज्य शासनाचे सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव सुमंत भांगे, राज्य शासनाचे इतर मागास वर्ग विभागाचे प्रधान सचिव वीरेंद्र सिंह, सहसचिव दिनेश डिंगळे, उपसचिव श्री झाल्टे, राज्य मागासवर्ग आयोगाचे सदस्य ॲडव्होकेट बी. एल. सगर किल्लारीकर, निवृत्त न्यायमूर्ती चंद्रालाल मेश्राम, ज्योतीराम चव्हाण, सदस्य सचिव श्रीमती आ. उ. पाटील यांच्या सह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. या सुनावणीत वीरशैव - लिंगायत समाजातील एकूण १५ जातींचा केंद्रीय ओबीसी लिस्ट मध्ये समावेश करण्यासाठी शिवा संघटनेकडून बाजू मांडण्यात आली.

ज्या उपजातींचा समावेश करण्यासाठी मांडणी करण्यात आली त्या उपजाती लिंगायात वाणी, लिंगायत जंगम, लिंगायत गुरव, लिंगायत तांबोळी, लिंगायत कुंभार, लिंगायत न्हावी, लिंगायत परीट, लिंगायत धोबी, लिंगायत फुलारी, लिंगायत सुतार, लिंगायत कुल्लेकडगी, लिंगायत कोष्टी, लिंगायत देवांग व लिंगायत साळी या उपजातींचा समावेश करण्यात येणार आहे.



# प्रदीप गोकुळ पाटील यांचा पिंप्राळानगरीत जाहीर सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** भारताचे माजी राष्ट्रपती, भारतरत्न, मिसाईल मेन, डॉ.ए. पी.जे.अब्दुल कलाम सरांच्या ९२ व्या जयंती निमित्त ड्रीम फाऊंडेशन, करुणा ग्रंथवाचक मंडळ व अनुप्रास बहुउद्देशीय शिक्षण संस्था छत्रपती संभाजी नगर यांच्या संयुक्त विद्यमाने देण्यात येणारा राज्यस्तरीय डॉ.कलाम राष्ट्र उभारणी प्रेरणा पुरस्कार २०२३ साठी जळगाव पिंप्राळा श्री साई कॉलनी येथील प्रदिप गोकुळ पाटील सामाजिक कार्यकर्ते यांची निवड करण्यात आली होती. प्रदिप पाटील व त्यांची पत्नी सौ. वर्षा पाटील हे मागील अनेक वर्षापासून शैक्षणिक, सामाजिक, युवा जागृती, महिला सक्षमीकरण, आधुनिक शेती, पर्यावरण व साक्षरता यासह राष्ट्रीय मूल्य लोकांमध्ये रुजविण्यासाठी कार्य करीत आहेत. त्यांच्या या विधायक कार्याची दखल घेऊन निवड समितीने त्यांची राज्यस्तरीय गौरवासाठी निवड केली होती. रविवार दि १५ ऑक्टोबर रोजी डॉ.अब्दुल कलाम साहेबांच्या जयंती दिनी सकाळी ११:०० वा. छत्रपती संभाजी नगर येथे वाणी कम्युनिटी हॉल , शिवाजी चौक , शिवाजी नगर, गारखेड येथे अशोक नगरकर - वरिष्ठ वैज्ञानिक ,पुणे , ( डॉ.अब्दुल कलाम सरांसोबत काम केलेले ) डी.आर.डी.ओ.- मा.राजेंद्र वाणी - सामाजिक कार्यकर्ते , मा. अजाबराव मनकर - शिक्षण तज्ञ , मा.अंकिता देगील - युवा शास्त्रज्ञ, शिवाजी वालेकर - यशोदिप करीयर अकॉडेमी , मा . काशिनाथ भतगुणकी लेखक व प्रेरक वक्ते ( डॉ.अब्दुल कलाम सरांची भेट घेऊन व्हिजनसाठी संपूर्ण भारतभर सायकल प्रवास करणारे ) यांच्या प्रमुख उपस्थितीत भव्य पुरस्कार वितरण सोहळा पार पडला. या सोहळ्यात श्री प्रदिप पाटील यांच्या परिवाराला सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, श्रीफळ मानाचा फेटा व डॉ.अब्दुल कलाम यांची ग्रंथे देऊन गौरव करण्यात आला. पुरस्कार मिळाल्या बद्दल श्री साई कॉलनी पिंप्राळा नगरीचे नाव लोकिक होत आहे. अनेक पुरस्कार आता पर्यंत त्यांना मिळालेली आहेत , कॉलनी परिसर असो , वा गाव पातळीवर असो प्रदिप पाटील हे अर्धी रात्री सेवा देण्यासाठी तत्पर राहतात. आणि यामुळे पिंप्राळा नगरीचे ही नावं गाजत आहे.

# श्रमिक वर्तमानपत्र विक्रेता संघटना यांच्या वतीने राष्ट्रपती ए.पी.जे. अब्दुल कलाम यांना अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** वृत्तपत्र विक्रेता दिनानिमित्त श्रमिक वर्तमानपत्र विक्रेता संघटना यांच्या वतीने माजी राष्ट्रपती ए पी जे अब्दुल कलाम यांना अभिवादन दिनांक 15 ऑक्टोंबर 2023 केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉक्टर भागवत जी कराड साहेब यांच्या उपस्थितीत वृत्तपत्र विक्रेता दिन माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉक्टर ए पी जे अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्ताने गारखेडा परिसरातील संत गाडगेबाबा उदानात साजरा करण्यात आला. यावेळी शिवाजी ढेपले यांनी संघटनेच्या वतीने मान्यवरांचे स्वागत व प्रास्ताविका संघटनेची दिशा व दशा व्यक्त करण्यात आली.



यावेळी वृत्तपत्र विक्रेता हा ऊन पाऊस वारा आणि नैसर्गिक आपत्ती असताना सुद्धा नियमित दैनंदिन ज्ञानाचा तिसरा डोळा व लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून प्रसिद्ध असणारे विविध विचारांची वर्तमानपत्र देशातील नागरिकांच्या घरोघरी पोहोचविण्याची काम अविरतपणे न थकता आपल्या व आपल्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी तुटपुंज्या कमीशनवर काम करून लोकांपर्यंत वर्तमानपत्र पोहोचवण्याचे काम करतात. वर्तमानपत्र विक्रेता कामगारांच्या आरोग्यासाठी निवासासाठी मुलांच्या शिक्षणासाठी सवलतीसाठी तसेच पुरवठा विभागातर्फे रेशन कार्ड समस्या व्यवसायासाठी बँक तर्फे कोणतेही अनुदान अथवा सहकार्य मिळत नाही या समस्या सोडवण्याची आवाहन,मा नामदार डॉ .भागवतजी कराड साहेब यांना करण्यात आले यावेळी मंत्री महोदयांनी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना वृत्तपत्र विक्रेता भवन बांधण्यासाठी निधी देण्याची घोषणा केली. यावेळी सोबत सर्व वृत्तपत्र विक्रेता बांधव व संघटनेचे पदाधिकारी प्रकाश वाघ, अध्यक्ष विष्णू कावळे, उपाध्यक्ष विठ्ठल पारटकर, दिलीप जगताप, सचिव शिवाजी ढेपले, कोषाध्यक्ष राजू गायकवाड, कार्याध्यक्ष रामकृष्ण राऊत' प्रा. मनोज बुऱ्हाडे, प्रा.गोविंद केंद्रे सर तसेच माझी महापौर बापू घडामोडी, नगरसेवक दिलीप थोरात व बालाजी मुंढे, लक्ष्मीकांत थेटे, महेश मावळतकर उपस्थित होते. 'कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाळकृष्ण शेवंते व प्रास्ताविक संघटनेचे सं -अध्यक्ष प्रकाश वाघ यांनी केले व विक्रेते बांधव, रामकृष्ण राऊत, पुंडलिक भोसले, जगदीश कुंटे, विष्णू ढाकणे, गजानन बर्गे, कृष्ण काळे, नंदकिशोर नागरे, सिद्धेश्वर खंदारे, गणपत रेनगडे, विजय राठोड, अंबादास कोल्हे, दत्ता गजमल, भागवत बोडके, संजय काथार, नारायण पोहेकर, बापू भोसले, बबन लहाने, नागेश प्रसाद,जनार्धन पिंजरकर, विशाल देशमुख, गजानन दामधर, दत्ता खरात, संदीप देवरे, नितीन दाड ,बालाजी सोळुंके, बळीराम काकडे, मंडलिक गाडेकर, रविंद्र कासलीवाल, संतोष खाडे, मिसाळ, सिद्धार्थ चव्हाण, संतोष जटाळे, सत्यनारायण मिरकर, रामचंद्र कांबळे व वाडातील नागरिक पद अधिकारी उपस्थित होते.

# महावितरणच्या विरोधात शेतकऱ्यांचे उपोषण

## 'भूमिपुत्र'चा पाठिंबा

आधुनिक केसरी न्यूज



**वाशीम :** नजीकच्या हिंगोली जिल्ह्यात महावितरणच्या अनागोंदी कारभाराला कंटाळून अखेर शेतकऱ्यांनी उपोषण आंदोलनाचा मार्ग अवलंबला आहे. गेल्या नऊ दिवसापासून शेतकऱ्यांचे उपोषण सुरू असून, उपोषणकर्ते डॉ. रमेश शिंदे, बद्रीनाथ घोंगडे, गोविंदराव भवर यांची तब्बेत खलावल्यामुळे त्यांना हिंगोलीच्या जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सदर उपोषण कर्त्यांची भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विष्णुपंत भुतेकर यांनी रुग्णालयात जावून भेट घेतली आहे. महावितरणच्या विरोधात असलेल्या या उपोषण आंदोलनास भूमिपुत्र शेतकरी संघटनेचा पाठींबा असल्याचे भुतेकर यांनी सांगितले आहे.

हिंगोली जिल्ह्यातील शेतकरी गेल्या नव दिवसांपासून महावितरणच्या आनागोंदी विरोधात उपोषणास बसले आहेत. उपोषण कर्त्यांची तब्येत बिघडल्यामुळे उपोषण कर्ते डॉ. रमेश शिंदे, गोविंदराव भवर, बद्रीनाथ घोंगडे यांची जिल्हा रूग्णालयात जाऊन भुमीपुत्र चे संस्थापक अध्यक्ष विष्णुपंत भुतेकर यांनी भेट घेतली. उपोषण कर्त्या शेतकर्यांच्या मागण्यां रास्त आसुन शेतकर्यांच्या उपोषणास भुमीपुत्र कडुन सहकार्यासह पाठींबा देण्यात आला. हिंगोली येथे भेटी दरम्यान पत्रकारांसी संवाद साधतांना राज्यातील शेतकर्यांच्या कृषी पंपाना मोफत व मुबलक विज मिळावी व शेतकऱ्यांवर महाराष्ट्रात जेव्हढेही विज चोरीचे गुन्हे दाखल आसतील ते सरकारने मागे घेतले पाहिजेत आसे भुमीपुत्रचे संस्थापक अध्यक्ष विष्णुपंत भुतेकर यांनी सांगीतले. या अनुषंगाने लवकरच भूमिपुत्र कडुन व्यापक अदोलंन हाती घेतले जाणार असल्याची माहीती त्यांनी दिली. या वेळी हिंगोली जिल्हाध्यक्ष रामेश्वर हेंद्रे, भागवतराव डव्हळे, महाविर ठाकुर सह हिंगोली जिल्ह्यातील पदाधिकारी उपस्थित होते.

# ओबीसी संघटनांशी चर्चेचे सरकारने जाहीर केलेले इतिवृत्त स्वागतार्ह

## डॉ. अशोक जीवतोडे

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** मराठा समाजाला सरसकट कुणबी जातीची प्रमाणपत्रे देऊन ओबीसीत सामील करण्याच्या मागणीसाठी मराठा समाजाकडून तर दुसरीकडे या मागणीच्या विरोधासाठी ओबीसींकडून आंदोलन सुरू असताना राज्य सरकारने २९ सप्टेंबर रोजी मुंबईत राज्यातील ओबीसी संघटनांची बैठक घेतली होती. या बैठकीचे इतिवृत्त मंगळवारी (दि. १७) जाहीर झाले. त्यात ओबीसी संघटनांच्या १५ मागण्यांवर सरकारकडून कोणती आश्वासने दिली, याचा तपशील आता उघड झाला आहे, हे इतिवृत्त स्वागतार्ह आहे, अशी माहिती राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे समन्वयक डॉ. अशोक जीवतोडे यांनी म्हटले आहे. मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे-पाटील यांनी अंतरवाली सराटी येथे उपोषण केले होते. राज्य सरकारने आश्वासने देऊन हे उपोषण सोडले. दरम्यान, चंद्रपूरचे ओबीसी कार्यकर्ते रवींद्र टोंगे यांनी मराठा समाजाला सरसकट कुणबी जातीचे प्रमाणपत्र देण्याला विरोध करून अन्नत्याग आंदोलन सुरू केले. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी टोंगे यांची भेट घेतल्यानंतर अन्नत्याग आंदोलनाची सांगता झाली. त्यानंतर राज्यातील ओबीसी संघटनांशी चर्चा करण्यासाठी २९ सप्टेंबर २०२३ रोजी मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली उपमुख्यमंत्री (गृह) देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री (वित्त) अजित पवार यांच्या उपस्थितीत सह्याद्री अतिथीगृहात बैठक झाली. ओबीसी संघटनांनी केलेल्या मागण्यांवर मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या निर्देशांचा संपूर्ण इतिवृत्तच मंगळवारी जाहीर करण्यात आला आहे.



ओबीसी आरक्षणाला धक्का न लावता मराठ्यांना कुणबी जात प्रमाणपत्र देताना जुन्या नोंदी तपासून जात प्रमाणपत्र देण्यात येईल. ओबीसी जातनिहाय सर्वेक्षणास सरकार अनुकूल असून बिहारच्या कार्यपद्धतीचा अभ्यास करणार, देशातील ओबीसी जनगणनेसाठी विधीमंडळाचा ठराव महारजिस्ट्रार व जनगणना आयुक्तांकडे सादर होईल, ७२ वसतिगृहे सुरू करणार, व्यावसायिक शब्द वगळण्यात येईल. वसतिगृहात प्रवेश नसणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आधार योजना लागू करण्याबाबत तपासणी करणार, बीसीए, एमसीएम अभ्यासक्रमाचे मॅपिंग करून शिष्यवृत्ती व फ्रिशिप लागू करू, ओबीसी संवर्गातील योजना लाभासाठी केंद्र शासनाने नॉन क्रिमिलेअर अट ठेवलेल्या योजनांची स्वतंत्र उत्पन्न मर्यादा न ठेवता केवळ नॉन क्रिमिलेअर अट ठेवण्यात येईल. अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ धर्तीवर कर्ज धोरण आखण्यात येईल. ओबीसी अधिकारी व कर्मचारी संख्या तपासणीसाठी राज्य मागासवर्गीय आयोगाला कळविण्यात येईल. केंद्राच्या विश्वकर्मा योजनेशी सांगड घालून योजना सुरू करू, महाज्योती, सारथी, टी. आर. टी. आय. योजनांसाठी समिती नेमण्यात येईल. अनुसूचित क्षेत्रातील १०० टक्के भरतीमधील ओबीसींवर झालेल्या अन्यायाबाबत तपासणी केली जाईल. विमुक्त जाती व भटक्या जमातीसाठी स्वतंत्र बैठक घेण्यात येईल. महाज्योती संस्थेच्या इमारत बांधकामाबाबत निर्णय घेण्यात येईल, अशी आश्वासने राज्य सरकारने दिली आहेत, ती पूर्ण होतील अशी अपेक्षाही डॉ. अशोक जीवतोडे यांनी व्यक्त केली आहे.

# अतिक्रमण नोटीस संदर्भात व्यावसायिकांना न्याय मिळण्यासाठी आझाद समाज पार्टीचे निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** आज़ाद समाज पार्टी मार्फत सर्व टपरीधारक, लोटगाडी धारक, भाजी विक्रेते व रस्त्यालगत व्यवसाय करणारे लहान मोठे पथ व्यावसायिक यांचे जिल्हाधिकारी विनंतीपूर्वक निवेदन देण्यात आले. धुळे शहरामध्ये किरकोळ व्यवसाय करून आमच्या कुटुंबियांचा चरितार्थ चालवितो. आम्ही किरकोळ भाजी विक्रेते, लोटगाडी धारक व्यावसायिक, टपरी धारक व्यवसायिक. त्याचप्रमाणे रस्त्यावर व्यवसाय करणारे छोटे पथ व्यवसायिक आहोत. आमचा व्यवसाय पैसे कमविण्यासाठी कधीच नसतो. फक्त पोटाची खळगी भरली जावी इतकेच आहे. त्या साठी योग्य ती सोय करण्यात यावी या साठी जिल्हा अधिकारी यांना निवेदन देण्यात आले.

मागील अनेक वर्षापासून सदरचा व्यवसाय धुळे महानगरपालिकेच्या परवानगीने धुळे शहरांमध्ये करत आलेले आहोत असे या निवेदनात म्हटले आहे.आजपर्यंत आमच्या व्यवसायामुळे रहदारीला कुठल्याही प्रकारची अडचण आलेली नाही.

आम्ही नियमितपणे 'पथ कर' भरीत असतो. धुळे महानगरपालिका आमच्याकडून प्रतिदिवशी रक्कम रुपये १५ घेऊन त्याची पावती आम्हाला देऊन व्यवसाय करण्याची परवानगी आजपर्यंत देत आलेली आहे. दरमहिन्याला किमान रु.४५०/- आमच्याकडून घेण्यात येतात. पुर्ण शहरातून लाखो रुपयांचा महसुल दर महिन्याला आमच्या मार्फत दिला जातो. याचा पुरावा म्हणून 'पथ 'कर' भरलेल्या पावत्या देखील आमच्याकडे उपलब्ध आहेत असे म्हटले. नोटीसमध्ये नमूद करण्यात आले आहे की दिनांक ६ ऑक्टोबर २०२३ रोजी मा. जिल्हाधिकारी साहेब तथा अध्यक्ष रस्ते सुरक्षा समिती, धुळे जिल्हा यांचे सोबत झालेल्या सभेच्या इतिवृत्तानुसार अर्जदारांचा व्यवसाय सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मालकीच्या रस्त्यांवर अतिक्रमण करीत असून वाहतुकीस अडचण निर्माण होत असल्याचे



नमुद करण्यात आले आहे. परंतु सदरील कारवाई ही एकतर्फी स्वरुपाची आहे असा आरोपही करण्यात आला. आम्हाला कोणत्याही प्रकारची पूर्वसूचना न देता आणि आमची बाजू ऐकून न घेता सदरचा निर्णय घेण्यात आलेला आहे. दिनांक ५ ऑगस्ट २०१९ च्या शासन निर्णयाची अंमलबजावणी नेमकी शारदीय नवरात्र, दसरा आणि दिवाळीच्या तोंडावर करण्याचा निर्णय घेतल्यामुळे आमच्या प्रमुख उत्पन्न मिळण्याच्या कालावधीतच आम्हाला व्यवसाय करता येणार नाही. जेव्हा इतर लोक त्यांच्या घरामध्ये सण साजरे करीत असतील तेव्हा आम्हाला व्यवसायातून उत्पन्न न मिळाल्याने उपाशी राहण्याची वेळ येणार आहे. आम्ही नियमानुसार महानगरपालिकेला महसुल देऊन व्यवसाय करत आलेले आहेत. शहराच्या अतिक्रमणविषयी त्याचप्रमाणे वाहतुकीचे नियंत्रणासाठी म्हणून आमचा व्यवसाय बंद करणे, आम्हा पथ व्यावसायिकांचे सामान जप्त करणे यापेक्षा आम्हाला व्यवसायासाठी स्वतंत्र जागा उपलब्ध करून देणे योग्य आहे.

आम्ही आजपर्यंत महानगरपालिकेला रोज रु.१५/- 'पथ-कर' स्वरुपात देत आलेलो आहोत. यापुढे देखील आम्ही धुळे महानगरपालिकेला पथ कर महानगरपालिकेचा वाढविण्यास हातभार लावू शकतो. वाहतुकीला अडचण होणार नाही आणि रस्त्यावर अतिक्रमण होणार नाही यासाठी पर्यायी जागा व्यवसायासाठी उपलब्ध करून दिल्यास नियोजित जागी व्यवसाय करणे सोयीचे होईल अशाप्रकारे निवेदनाच्या माध्यमातून जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले. मा. जिल्हाधिकारी, आपणास आम्ही विनंती करतो की, ऐन सणासुदीच्या काळात पथ व्यवसायिकांची उपासमार करणारी ही नोटीस तात्काळ मागे घेण्यात यावी. अन्यथा पक्षातर्फे तीव्र आंदोलन करून आमरण उपोषणास आम्हाला बसावे लागेल. याची कृपया नोंद घ्यावी.

# प्रशांत वाघोदे यांच्या जीवाला धोका

आधुनिक केसरी न्यूज

**लोणार :** वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा नेते तथा जिल्हा महासचिव प्रशांत भाऊ वाघोदे यांना बुलढाणा मतदारसंघाचे विद्यमान आमदार संजय गायकवाड यांच्या समर्थकांनी मोबाईल द्वारे अर्वाच्च आणि अश्लील शिवीगाळ करून हातपाय तोडण्याची व जिवे मारून टाकण्याची धमकी दिली आहे. सदर आमदार समर्थकांनी दिलेली धमकी प्रकरणी बोरखेडी पोलीस स्टेशनला सुद्धा FRI दाखल आहे.

आमदार संजय गायकवाड आणि त्यांच्या समर्थकांकडून जिल्हा नेते प्रशांत भाऊ वाघोदे यांच्या जीवाला धोका आहे तो नाकारता येत नाही अशा या गांभीर्यपूर्वक घटनेची दखल घेऊन प्रशांत भाऊ वाघोदे जिल्हा नेते यांना २४ तासाच्या पोलीस संरक्षण द्यावे. अन्यथा वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष आदरणीय बाळासाहेब आंबेडकर यांच्या आदेशानुसार संपूर्ण जिल्ह्यात उग्र स्वरूपाच्या आंदोलन करण्यात येईल त्या आंदोलनामुळे निर्माण होणाऱ्या प्रत्येक घटनेला सर्वस्वी जबाबदारी पोलीस प्रशासनाचे राहील असे निवेदन उपविभागीय पोलिस अधिकारी मेहकर यांच्या मार्फत जिल्हा पोलिस अधीक्षक यांना देण्यात आले यावेळी नागवशी संघपाल पनाड, वंचित नेते, अनित्य घेवंदे युवा नेते, बळीभाऊ मोरे तालुका महासचिव,सुनील भाऊ इंगळे तालुका महासचिव भाई विलास लहाने,भाई सुभाष मोरे, उपाध्यक्ष दीपक भाऊ मोरे, युवा शहर अध्यक्ष महेंद्र मोरे,प्रशिस इंगळे जि.युवा सचिव,सिद्धार्थ मुळे, सिद्धार्थ अवसरमोल आदी उपस्थित होते.





# चंद्रपुरात आजपासून होणार माता महाकाली महोत्सव

## लखबिरसिंग लखवा, अनुराधा पौडवाल, वैशाली सामंत, निरंजन बोबडे, इशरत जहाँ यांची उपस्थिती

आधुनिक केसरी न्यूज



**चंद्रपूर :** आराध्य दैवत म्हणून प्रसिद्ध असलेल्या माता महांकाली देविच्या महोत्सवाला आजपासून प्रारंभ होणार आहे. पाच दिवस चालणाऱ्या या महोत्सवात लखबिरसिंग लख्खा यांच्या द्वारे देविचे जागरण, अनुराधा पौडवाल यांचा संगीतमय भजन संध्येचा कार्यक्रम, वैशाली सावंत यांच्या गाण्याची मेजवानी, निरंजन बोबडे या युवा कलावंताचा स्त्री शक्तीचा जागर हा तब्बल 150 कलावंतांचा कार्यक्रम, सोपान कन्हेरकर यांचं किर्तन, तर पालखी प्रदक्षीणेला ईशरत जहां यांच्या सुरेल भक्तीमय गितांची साथ लाभणार आहे.

संपूर्ण दिवसभर स्थानिक कलावंतांचे विविध कार्यक्रम, विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सत्कार, वेगवेगळ्या विषयांवर मार्गदर्शन, स्त्री ला तिच्या भावना मोकळ्या मनानी मांडता याव्या म्हणून बाईपण भारी देवा खे खुले व्यासपीठ, खास महिलांचेच कविसंमेलन आणि ९९९९ कन्यांच पुजन व त्यांचे भोजन असा भरगच्च कार्यक्रम पंचमी ते नवमी असा चालणार आहे.

या कार्यक्रमाच्या अनुषंगाने या नवरात्रात चंद्रपूर शहरात जन्माला आलेल्या कन्यांच्या वडिलांना चांदीचं नाणं देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. स्थानिक आमदार किशोर जोरगेवार यांच्या संकल्पनेतून मागील वर्षांपासून श्री माता महांकाली महोत्सवाला सुरुवात करण्यात आली. चंद्रपूरकरांच्या मनातील भावनेला ओळखून आमदार किशोर जोरगेवार यांनी हा महोत्सव सुरु केल्याने याला चंद्रपूरकरांनी अलोट प्रतिसाद दिला होता. यावर्षीही नागरिकांमधे प्रचंड उत्साहाचं वातावरण असून लोकं या महोत्सवाची आतूरतेने



वाट पहात आहेत.

पाचशे वर्षाची ऐतिहासिक परंपरा लाभलेल्या या शहरात गौंड राजाचे वास्तव्य होते. राणी हिराई यांनी या महाकाली मंदिराचे निर्माण केले. तेव्हापासून माता महांकाली हे चंद्रपूरकरांचं आराध्य दैवत म्हणून पुजल्या जातं. या देविच्या पुजनासाठी पश्चिम महाराष्ट्रातील नांदेड, लातूर, उस्मानाबाद, बिड यासह विविध जिल्ह्यातील भाविक तर येतातच शिवाय आंध्रप्रदेश, तेलंगणा, मध्यप्रदेश, छत्तीसगड अशा विविध राज्यांतील भाविक देखील नवरात्रोत्सवात दर्शनाला येत असतात. संपूर्ण वर्षभरच या मंदिरात भाविकांची गर्दी असते.

यावर्षीच्या या महांकाली महोत्सवात केदारनाथ येथील डमरू पथक, वाराणसी येथील गंगाआरती, पंढरपूर येथील टाळ मृदुंगाच्या ठेक्यावर विठ्ठलाचा गडर करणारे वारकरी, असे विविध राज्यांतील विविध क्षेत्रातील कलावंत आपली कला सादर करणार आहेत. एकूणच चंद्रपूरांना माता महांकाली महोत्सवाच्या निमित्याने पाच दिवसात भरगच्च कार्यक्रमांची मेजवानीच मिळणार आहे.

> पालखी सोहळ्याला मा. मुख्यमंत्री स्वत: सपत्नीक उपस्थित राहणार असून पालखी उचलण्याचा मान मुख्यमंत्र्यांना दिला जाणार आहे. पुढे हीच परंपरा कायम रहावी व महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीच ही पालखी उचलतील असा पायंडाच पडावा अशी अपेक्षा आमदार किशोर जोरगेवार यांनी व्यक्त केली आहे.
>
> महाकाली महोत्सव हा चंद्रपूरकरांचा महोत्सव असून या महोत्सवाची सुरुवात मी केली असली तरी हा महोत्सव व पालखी सोहळा हा वर्षानुवर्ष पुढेही असाच सुरु रहावा व माता महांकालीची महती ही केवळ महाराष्ट्रापुरता सिमित न राहता ती देशभर पसरावी व यातून येथील पर्यटनालाही वाव मिळावा, रोजगाराच्या संधीही यातून निर्माण व्हाव्यात असा विश्वास ठेवून हा महोत्सव सुरु करण्यात आला आहे.
>
> **किशोर जोरगेवार, आमदार चंद्रपूर विधानसभा निर्वाचन क्षेत्र.**

# सावळदबारा शिवारात रानडुकरांचा धुमाकूळ

## पिकांची नुकसान भरपाई द्यावी; विजय काळे

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथील शेतकऱ्यांचे कपाशी, सोयाबीन व मका पिंकाचे जंगली रानडुक्कर व निलगाईकडून मोठ्या प्रमाणात नुकसान करत या सर्व शेतकऱ्यांना तात्काळ नुकसान भरपाई देऊन यांचा बंदोबस्त करण्यात यावा अशी मागणी अ.भ.भ्रष्टाचार संघर्ष समितीचे सोयगाव तालुका अध्यक्ष तथा उपसंपादक विजय काळे यांनी अजिंठा वनपरिक्षेत्राचे अधिकारी निलेश सोनवणे यांच्या कडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे. सावळदबारा येथील रहिवासी अल्पभूधारक शेतकरी शंकर रंगनाथ बगाड गट नंबर २२३ क्षेत्र एक हेक्टर शिवार पैकी एक एक्कर शेतात रानडुक्करांनी धुमाकूळ घालून कपाशी पिकाचे नुकसान केले सावळदबारा या शिवारात शंकर बगाड यांच्या शेतात रानडुकराकडून कपाशी पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. रानडुकराचा बंदोबस्त करून नुकसान भरपाई देण्यात यावी.सावळदबारा शिवारात शेतकर्यांनी शेतात सध्या कापूस, तूर, सोयाबीन आदि पीक लागवड केली आहेत.



सध्या शेतकरी निसर्गाच्या लहारीपणामुळे त्रस्त असतांना रानडुकराने पिकांची नासाडी करण्यास सुरुवात करीत नुकसान केल्या जात पिकांची नुकसान होत असल्याने येथील सर्व शेतकरी त्रस्त होत आहे. अजिंठा वनीकरण विभागाने वन्य प्राण्याचा बंदोबस्त करून नुकसान भरपाई देण्याची मागणी विजय काळे उपसंपादक व शेतकरी शंकर बगाड यांनी केली आहे. सावळदबारा शिवारात दोन एक हेक्टर कपाशी पिकाची लागवड केलेली आहे.या परिसरात निलगाई व रानडुक्कर यांचे कळपच असतात रानडुकराकडून ४० आर कपाशी पिकाची नासाडी करून नुकसान केले आहे. तसेच मका व कपाशी लागवड केलेली आहे. तिथे रानडुकर लहान झाडांचे बोड खावून नुकसान करीत आहे. याकडे अजिंठा वनीकरण विभागाने लक्ष देऊन नुकसान भरपाई तात्काळ द्यावी- या जंगली जनावरे यांचा बंदोबस्त करण्यात यावा अशी मागणी अखिल भारतीय भ्रष्टाचार संघर्ष समितीचे सोयगाव तालुका अध्यक्ष विजय काळे तथा उपसंपादक व शेतकरी शंकर बगाड यांनी वनपरिक्षेत्राचे अधिकारी निलेश सोनवणे यांच्या कडे केली आहे.

# तालुक्यात गावागावात पुढारी प्रवेशाला विरोध

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** मनोज जरांगे पाटील यांच्या अंतरवाली सराटी अंबड जालना येथील वैश्विक गर्दी सभेनंतर जिल्ह्यातील खुलताबाद तालुक्यातील ग्रामीण भागात मराठा आरक्षण नाही तर गाव प्रवेश नाही असी भुमिकाच तरुण युवकांनी घेतल्याने पक्षपुढाऱ्यांचे गाव प्रवेशचा प्रश्न उभा राहिला आहे व ठिकठिकाणाहुन पुढाऱ्यांना भ्रमणध्वनीवर आरक्षण ची भुमिका बद्दल माहिती विचारत भांडावून सोडल्याने मोठी डोके दुःखी वाढली आहे.

एकच ध्यास मराठ्यांना आरक्षण असी एकच भुमिका युवक तरुणांनी घेतल्याने पुढाऱ्यांचे मोठे टेंशन वाढले आहे.पक्ष राजकारण गेली चुलीत फक्त आरक्षणच असे वातावरण सद्या सर्वत्र पहावयास मिळत आहे. मराठा आरक्षण जागर बद्दल जरांगे पाटील यांनी खुलताबाद तालुक्याचा दौरा करून सकल मराठा समाजाची जागृती केली.व अंतरवाली सराटी अंबड जालना येथे वैश्विक असी गर्दी करावून सरकार ला शेवटचा इशारा दिला.परंतु सरकारच्या प्रोसेस मधे आरक्षण असले तरी मात्र मराठा युवक तरुण ग्रामीण भागात गंभीर झाले असुण त्यांनी एकच ध्यास फक्त मराठ्यांना आरक्षण असी ताठर भूमिका घेतली आहे व आरक्षण शिवाय पुढाऱ्यांना गावप्रवेश नाही असे तालुक्यात ठिकठिकाणी जाहीर केल्याने पुढाऱ्यांचे टेन्शन वाढले आहे तर पक्ष व पुढारी आमदार खासदार यांना भ्रमणध्वनी द्वारें मराठा आरक्षण चे काय?असे प्रश्न करत भाडांवून सोडत असल्याने पुढाऱ्याची मोठी डोकेदुखी वाढली आहे.हे विशेष.

# वडोद बाजार येथे मिळाली सिंगल फेज डीपी

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील वडोद बाजार येथील वार्ड क्रमांक एक येथील स्मशान भूमी जवळ असलेल्या सिंगल फेज डीपीचे गट्टू जळाले होते त्यामुळे गावात सर्वत्र अंधार पसरला होता महावितरण विभागाच्या अधिकाऱ्याने याकडे लक्ष देऊन वडोद बाजार येथे सिंगल फेज डीपी उपलब्ध करून दिली. त्यामूळे वडोद बाजार येथील नागरिकांचा विजेचा प्रश्न मार्गी लागला आहे. वडोद बाजार येथील सिंगल फेज डीपी वरील दोन गट्टू जळाल्याने वार्ड क्रमांक एक मधील नागरिकांना अंधाराचा सामना करावा लागत होता मागील दोन चार दिवसापासून गावातील नागरिक अंधारात राहत होते. येथील नागरिकांना सिंगल फेज काळात अंधारात राहण्याची वेळ आली होती. वडोद बाजार येथील



महावितरणच्या महिला कर्मचारी साळवे यांनी वरिष्ठ अभियंता मयूर गुजर यांच्याकडे वडोद बाजार येथील सिंगल फेज डीपी जळाल्याची माहिती पाठवून दिली होती दिली होती महावितरण विभागाचे अभियंता मयूर गुजर यांनी वडोद बाजार येथील सिंगल फेज डीपी उपलब्ध करून दिली रात्रीच्या वेळी विजेचा प्रश्न संपला सुटला आहे. नागरिकांकडून महावितरण विभागाचे आभार मानले जात आहे सिंगल फेज डीपी उपलब्ध करून दिली बुधवारी येथे स्मशानभूमी या ठिकाणी सिंगल सिंगल फेज डिपी बसविण्यात आली यावेळी विभागाच्या महिला महिला कर्मचारी साळवे , गजानन लहाने , समीर सय्यद, शेख शकील यांनी डी पी बसवण्याचे काम केले यावेळी गावातील नागरिक उपस्थित होते. वडोद बाजार येथे महावितरण विभागाचे महिला कर्मचारी असतानाही गावातील विजेचा प्रश्न लवकर सोडावला जातो सामान्य नागरिकांचे महावितरणच्या काही समस्या प्रश्न असल्यास महिला कर्मचारी साळवे यांना माहीत होताच त्या नागरिकांचा प्रश्न सोडवण्यासाठी तत्पर असतात सध्या वडोद बाजार गावात थ्री फेज थ्री फेज लाईनचे काम सुरू असून लवकरच गावात 24 तास थ्री फेज लाईट मिळणार आहे.



# ज्ञानकुंज कनिष्ठ महाविद्यालयात वृक्षारोपण

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील बाजार सावंगी येथे आज दिनांक 16 ऑक्टोंबर 2023 वार सोमवार रोजी ज्ञानकुंज कनिष्ठ महाविद्यालयातर्फे बाजार सावंगी या ठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले. याप्रसंगी सरपंच माननीय श्री अप्पाराव पाटील नलावडे, पुंजाजी अण्णा नलावडे, कल्याण काटकर, वसंत अण्णा नलावडे, ग्रामसेवक बनसोड साहेब, सकाळ समूहाचे पत्रकार श्री श्रीधर पाटील सर, भिकनदादा घुले, इत्यादी ग्रामस्थ याप्रसंगी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.



# बाल क्रीडा स्पर्धेत भोळीच्या शाळेचे उज्ज्वल यश

आधुनिक केसरी न्यूज

**लोणंद :** स्वर्गीय यशवंतराव चव्हाण बाल क्रीडा केंद्रस्तरीय स्पर्धेचे आयोजन भोळी ता.खंडाळा येथे करण्यात आले होते. या स्पर्धेत भोळीसह लोणी, तोंडल, भोळी, शेखमिरेवाडी, मानेकॉलनी, पिसाळवाडी, धनगर वाडी, पानसरे वस्ती, महांगरे वस्ती आदी गावातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. विविध शाळांनी या स्पर्धेततून यश मिळविलेले आहे. यात भोळी येथील विद्यार्थ्यांनी सुद्धा घवघवीत असे यश मिळविलेले आहे.तत्पूर्वी स्पर्धेचे उदघाटन भोळी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष अनंत चव्हाण, उपाध्यक्ष शैला चव्हाण, लोणी केंद्राचे केंद्रप्रमुख माणिकराव बिचकुले यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. यावेळी शाळा व्यवस्थापन समिती सदस्य भरत चव्हाण, सदस्य मयुरी पवार, मुख्याध्यापक मनोज रामगुडे व केंद्रातील सर्व शिक्षक वृंद उपस्थित होते. २०० मीटर धावणे मुलीमध्ये संस्कृती अमोल चव्हाण (प्रथम क्रमांक), ४०० मीटर धावणे मुलींमध्ये श्रेया बाळू जाधव (द्वितीय क्रमांक),लांब उडी मुलांमध्ये ओम अमोल चव्हाण (तृतीय क्रमांक),लांब उडी मुलींमध्ये श्रेया बाळू जाधव (द्वितीय क्रमांक),योगासना मध्ये अर्णव मंगेश पवार (द्वितीय क्रमांक), ४×१०० रिले मुलींमध्ये (तृतीय क्रमांक) संस्कृती अमोल चव्हाण, श्रेया बाळू जाधव, ऋतुजा नितीन चव्हाण, मंजिरी सचिन कदम आदींनी यश मिळवले आहे. तसेच लंगडी या स्पर्धेत मुलींमध्ये (तृतीय क्रमांक) आणि मुलांमध्ये द्वितीय क्रमांक मिळविला आहे.

# वाचनाने माणूस संस्कारशील होऊन व्यक्तिमत्त्व विकास साधतो : प्रा. डॉ. मस्के

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** जगातील अनेक महान व्यक्ती स्वतःला समृद्ध करण्यासाठी सतत वाचन करत असतात. वाचनाच्या बळावरच स्वतःचा सामाजिक, भावनिक, बौद्धिक, विकास करून सामाजिक कार्यात उतरत असतात. छत्रपती शिवाजी महाराज, म.फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, संत गाडगेबाबा, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम अशी विविध चरित्रे वाचून आपणही आपल्या स्वतःच्या जीवनात बदल करून सामाजिक विकास साधला पाहिजे. असे मत वाचन पेटी उपक्रमांतर्गत पिंपळनेर येथे वाचन प्रेरणा दिनानिमित्त अध्यक्षीय समारोप करताना प्रा. डॉ. सतीश मस्के यांनी व्यक्त केले.

माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे अब्दुल कलाम यांच्या 92 व्या जयंतीनिमित्ताने पिंपळनेर येथील कै नानासाहेब साहेबराव पंडित पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाचच्या अध्यक्षस्थानी कर्म आ.मा. पाटील महाविद्यालयाचे मराठीविभाग प्रमुख प्रा डॉ. सतीश मस्के होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्त्व तसेच आयुष्यामध्ये होणारे वाचनाचे फायदे यावर विद्यार्थ्यांना गोष्टीच्या माध्यमातून मार्गदर्शन केले. शंभर टक्के यशाचा मार्ग म्हणजे वाचन होय हे विद्यार्थ्यांना विविध महापुरुषांचे दाखले देऊन त्यांनी पटवून दिले. या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे होता. यासाठी विद्यालयात 'वाचन पेटी' हा उपक्रम सुरू करण्यात आला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले पिंपळनेर शहरातील विविध क्लासेसचे संचालक संजय बोरसे,राजेंद्र नरवाडे, प्रवीण गांगुर्डे, हरिशचंद्र गुजराथी यांनी प्रत्येकी 2000 रुपये देणगी देऊन विद्यार्थ्यांना वाचनीय पुस्तकं उपलब्ध करून दिलीत. महान व्यक्तींच्या आयुष्यात वाचनामुळे घडलेले संस्कार याविषयी माहिती मिळावी, विद्यार्थ्यांनी लहान वयातच वाचनाचा छंद जोपासावा तसेच पुढील काळामध्ये वाचन संस्कृती विकसित व्हावी यासाठी विद्यालयात या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले असे शिक्षक सचिन जाधव यांनी सांगितले.

कार्यक्रमासाठी उपस्थित असलेल्या प्रमुख पाहुण्यांचा सत्कार विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षक ठिन्गले एम. वाय., महाजन एस.बी, दुपार सत्र प्रमुख भदाणे ए. एम. सर यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यालयातील उपक्रमशील शिक्षक सचिन शिवाजी जाधव यांनी केले. प्रास्ताविक विद्यालयातील उपशिक्षिका अकलाडे आर एस, कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे यांचा परिचय विद्यालयातील कलाशिक्षक गांगुर्डे पी.जी व आभार प्रदर्शन वाघ पी एस यांनी केले.

या उपक्रमाबद्दल विधायक समिती या संस्थेचे अध्यक्ष सुभाष दामोदर जगताप,सचिव महेंद्र रामराव गांगुर्डे,विद्यालयाचे मुख्याध्यापक शाह.एस एस, उपमुख्याध्यापक पाटील यु.जे, सत्र प्रमुख मुसळे एल बी, सोंजे आर डी यांनी विद्यार्थी व शिक्षकांचे कौतुक केले.

# आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचा लाभ घ्यावा

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यात व सावळदबारा परिसरात सध्या आरोग्य विभागा मार्फत जाणाऱ्या महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचा लाभ सोयगाव तालुक्यातील नागरिकांनी घ्यावा असे आवाहन जिल्हा परिषद सदस्य गोपीचंद जाधव यांनी केले आहे. सदरील योजनेसंदर्भात माहिती देतांना सांगीतले. महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेचा लाभ घेण्यासाठी पिवळे, केशरी, अंत्योदय अन्न योजना, अन्नपूर्णा योजना शिधापत्रिकाधारक कुटुंबे शुभ्र शिधापत्रिका किंवा शिधापत्रिका नसेल तर अधिवास दाखला, तहसीलदार दाखला व फोटो ओळखपत्र, शासकीय, निमशासकीय कर्मचाऱ्यांकडून योजनेच्या लाभाची विदरुक्ती टाळण्यासाठी कोणत्याही शासकीय आरोग्य योजनेचा लाभ घेतला नसल्याबाबतचे स्व घोषणापत्र घेण्यात येते. शासकीय अनाथाश्रमातील मुले शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थी शासकीय महिला आश्रमातील महिला, शासकीय वृध्दाश्रमातील जेष्ठ नागरिक माहिती व जनसंपर्क कार्यालयाकडील निकषानुसार पत्रकार, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील नोंदीत जीवित बांधकाम कामगार व त्याचे कुटुंब आयुष्मान भारत -प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचा लाभ घेण्यासाठी प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचा लाभ घेण्यासाठी सामाजिक आर्थिक व जातनिहाय जनगणनेत नोंदीत ग्रामीण व शहरी भागातील कुटुंबे लाभ घेण्यासाठी आयुष्मान कार्ड (ई- कार्ड) व फोटो ओळखपत्र आयुष्मान कार्ड प्राप्त करण्यासाठी आयुष्मान कार्ड बनविण्यासाठी शिधापत्रिका वैय ओळखपत्र (आधार कार्ड) घेऊन अंगीकृत रुग्णालय किंवा नजीकच्या आपले सेवा केंद्रास भेट देणे.

# दोन विशेष गाड्यांच्या फेऱ्यांमध्ये आणखी वाढ

आधुनिक केसरी न्यूज

**अकोला :** पुणे-अजनी साप्ताहिक विशेष गाडीच्या १४ फेऱ्या धावणार असून एलटीटी-बल्हारशाह विशेष रेल्वेच्या कालावधीत वाढ करण्यात आली आहे. ०२१४१ पुणे-अजनी साप्ताहिक विशेष गाडी पुण्यावरून १७ ऑक्टोबर ते २८ नोव्हेंबर या कालावधीत दर मंगळवारी दुपारी ३.१५ वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी ४.५० वाजता अजनीला पोहोचेल. ०२१४२ अजनी-पुणे अजनी येथून १८ ऑक्टोबर ते २९ नोव्हेंबर दरम्यान दर बुधवारी सायंकाळी ७.५० वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी ११.३५ वाजता पुणे जंक्शनला पोहोचणार आहे. या गाडीला दौंड कॉर्ड लाईन, कोपरगाव, मनमाड, भुसावळ, शेगाव, अकोला, बडनेरा, धामणगाव आणि वर्धा येथे थांबा राहणार आहे.

# दिनेश तांडेल यांनी केली मैदानाची साफसफाई

आधुनिक केसरी न्यूज



**उरण :** सिध्दीविनायक म्हटले की एकच गावचे नाव उरणमध्ये येते ते म्हणजे सोनारी. आणी सोनारी म्हटले कि क्रिकेटची पंढरी. सोनारी गावाने आजपर्यंत अनेक महान क्रिकेटर बनवले आहे. किशोर कडू, जितेंद्र कडू (जितू ),जयेंद्र कडू, आदेश कडू, संदीप पाटील (पप्पू )असे अनेक रायगडमध्ये नावाजलेले क्रिकेटर बनवले आहेत.मात्र सोनारी गावच्या मैदानात कचरा झाले होते. खेळाडूंना व्यवस्थित खेळता येत नव्हते. खेळाचा नीट सरावही करता येत नव्हता ही समस्या लक्षात आल्यानंतर सोनारी गावचे तंटामुक्ती अध्यक्ष दिनेश तांडेल यांनी ही समस्या सोडविण्यासाठी पुढाकार घेतला.सोनारी गावाच्या मैदानाची साफ सफाई सोनारी गावचे तंटा मुक्ती अध्यक्ष दिनेश रमण तांडेल यांनी सामाजिक बांधिलकी जपत स्व खर्चाने केली. दिनेश तांडेल यांनी हि सेवा केल्या बद्दल संपूर्ण सोनारी गावाचे सर्व क्रिकेट खेळाडू यांनी आनंद व्यक्त केले आहे.

तसेच फ्रेंड्स 11 सोनारी 40+मास्टरचे कर्णधार मधुकर कडू यांनी दिनेश तांडेल यांनी स्वखर्चाने मैदानाची साफ सफाई केल्या बद्दल संघाच्या वतीने आभार मानले आहेत.स्व खर्चातून मैदानाची साफसफाई केल्याने सर्व खेळाडूमध्ये आनंदाचे वातावरण आहे. खेळाडूंना आता क्रिकेट खेळ खेळण्यासाठी उत्तम व स्वच्छ मैदान मिळाल्याने खेळाडूंना या मैदानावर क्रिकेटचा उत्तम सराव करता येणार आहे.



# सरपंच जाधव विरोधात अविश्वास ठराव

## मनमानी कारभार, सदस्यांना विश्वासात न घेणे

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील मौजे बोडखा/गंधेश्वर ग्रुप ग्रामपंचायत चे सरपंच अशोक सांडु जाधव यांच्या विरोधात दि.१७ रोजी दोन विरुद्ध सात, ३/४मताने हातवर करुन बहुमताने अविश्वास ठराव संमत करण्यात आला. दि.१० खुलताबादचे मा.तहसीलदार कंकाळ यांच्याकडे बोडखा/गंधेश्वर ग्रुपग्रापं, उपसरपंचासह सात विद्यमान ग्रामपंचायत सदस्यांनी सरपंच विरोधात मनमानी कारभार करत असल्याबाबत अविश्वास प्रस्ताव दाखल केला होता. त्याअविश्वास ठराव प्रक्रिया साठी दि.१७ रोजी दुपारी एक वाजता विशेष सभेचे आयोजन तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले होते. ठराव प्रक्रिया एक वाजून पाच मिनिटांनी सुरु करण्यात आली.सरपंच अशोक सांडु जाधव हे गैरहजर राहिले. फरजाना पटेल, डॉ जाकीर शहा, अश्विनी काटकर,वैशाली शेळके,अरुण गायकवाड,द्वारका बाई जाधव, शबाना अक्रम पटेल या सात सदस्यांनी अविश्वास प्रस्ताव दाखल केला होता.त्या विद्यमान ग्रामपंचायत सदस्यांनी हातवर करुन बहुमताने अविश्वास ठराव संमत केला.सुचक म्हणून फरजाना पटेल तर अनुमोदन द्वारकाबाई जाधव यांनी दिले. आखेर अविश्वास ठराव संमत झाला.तदनंतर गावात नागरिकांनी एकच जल्लोष केला.



खुलताबाद तालुक्यातील पाडळी येथे नरसिंह वाचनालय येथे वाचन प्रेरणा दिन म्हणून उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळी संजय वाहटुळे, भरत काळे, भीमराव पोलीस पाटील, बाळू जाधव, विजय गायकवाड, संतोष आव्हाड, मच्छिंद्र वाघ, राजू सोनवणे इतर वाचक गावकरी उपस्थित होते.

# बेनाळ येथे संगीतमय भागवत कथेचे आयोजन; भाविक भक्तांनी लाभ घ्यावा

आधुनिक केसरी न्यूज



**लोहा :** शहरातील बेनाळ येथे आई तुळजाभवानी नवरात्रोत्सवानिमित्त १७ ते २३ ऑक्टोबर संगीतमय भागवताचार्य कु.वैष्णवी दीदी गोड यांच्या मधूर वाणीतून श्रीमंत भागवत कथा होणार आहे. परिसरातील भावीक भक्तांनी कार्यक्रमाचा लाभ घ्यावा. नवरात्रोत्सवाच्या दहाही दिवशी दररोज सकाळी ८ वाजता आणि रात्री ७ वाजता ह.भ.प तुकाराम पालीमकर यांचा उपस्थित हरिपाठ व देवीची आरती होणार असून आरती नंतर रात्री ८ते ११ संगीतमय श्रीमंत भागवत कथा भागवताचार्य कु.वैष्णवी दीदी गोड, त्यांना साथ देतील गायक म्हणून गणेश महाराज, तबला वादक - हरिओम महाराज जामगे,सिंध वादक - विश्वा महाराज कदम रात्री ११ वाजता भागवत कथेची आरती होणार आहे. २४ ऑक्टोबर दशमीच्या दिवशी सकाळी ९ वाजता दिंडी प्रदक्षिणा १० ते १२ ह.भ.प जानकिराम कंधारकर यांचे काल्याचे किर्तन महाआरतीनंतर महाप्रसाद आयोजित करण्यात आले आहे, अशी माहिती सार्वजनिक नवरात्र महोत्सव बेनाळ कमिटीच्या वतीने देण्यात आली आहे.

हिवराळे क्लिनिक ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन, ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# बसवेश्वररांविषयी अपशब्द ; आ. आव्हाडावर गुन्हा दाखल करा

## धर्माबाद सकल वीरशैव लिंगायत समाजाची मागणी : पानसरे चौकामध्ये जोडो मारो आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**बाबूराव गोनारकर**

**धर्माबाद :** लिंगायत धर्म संस्थापक महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या बद्दल अवमान कारक वक्तव्य केल्याबद्दल आमदार जितेंद्र आव्हाड यांच्यावर गुन्हा दाखल करून तत्काळ अटक करावी या संदर्भात धर्माबाद तालुक्यातील वीरशैव लिंगायत समाजाच्या वतीने सकाळी साडेअकरा वाजता पानसरे चौकामध्ये जाहीर निषेध व्यक्त करण्यात आला. यावेळी जितेंद्र आव्हाडांच्या प्रतीकात्मक बॅनरला जोडे मारो आंदोलन करण्यात आलं. लोकशाहीचे जनक थोर समाज सुधारक लिंगायत धर्म संस्थापक महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या बद्दल "त्यांनी आत्महत्या केली" असे अवमान कारक माहिती नसलेले वक्तव्य आमदार जितेंद्र आव्हाड यांनी नुकतेच समाज माध्यमासमोर केले होते त्याचा व्हिडिओ मोठ्या प्रमाणामध्ये वायरल झाल्यामुळे देशभरातील आठ कोटी लिंगायत समाज बांधवांच्या भावना दुखावल्या आहेत. या प्रकरणी आमदार जितेंद्र आव्हाड यांनी जाहीर माफी मागावी व यापुढे अशा थोर महात्मा पुरुषाबद्दल बोलताना अभ्यास करून बोलावे, अशी मागणी धर्माबाद लिंगायत समाजाच्या वतीने दिलेल्या निवेदनात करण्यात आलेली आहे. यावेळी धर्माबाद तालुक्यातील तमाम वीरशैव लिंगायत समाजातील युवक बांधव रस्त्यावर उतरले होते पानसरे चौकातून घोषणा देत पोलीस स्टेशन येथे जाऊन आमदार जितेंद्र आव्हाड यांच्या बद्दल रीतसर तक्रार देण्यात आली. त्यानंतर तिथून  वीरशैव लिंगायत समाजाची सर्व तरुण मंडळी तहसील कार्यालया येथे जाऊन तहसीलदारांना कायदेशीर कारवाई करण्यासंदर्भात



निवेदन देण्यात आले. बाराव्या शतकामध्ये समतेचा संदेश देणाऱ्या जगत ज्योती महात्मा बसवेश्वर महाराजांनी अनुभव मंटपाच्या माध्यमातून खरी लोकशाही रुजवली आणि आज त्याच धर्तीवर भारत अनुभव मंटप ही लोकशाहीची वास्तू तयार झालेली आहे. देशभरामध्ये संपूर्ण समाज बांधवांमध्ये एकता व समरसता निर्माण झाली आहे अशा महाराष्ट्रातील अनेक संत महात्म्यांविषयी राज्यकर्त्यांनी बोलताना भान जपावे अशीही मागणी सकल वीरशैव लिंगायत समाजाच्या वतीने करण्यात आली आहे. यावेळी सकल लिंगायत समाजाचे अनेक ज्येष्ठ मंडळी सुद्धा या आंदोलनामध्ये उपस्थित झाल्याने महात्मा बसवेश्वर महाराज की जय या घोषानेने संपूर्ण धर्माबाद शहर दणाणून गेले होते व जितेंद्र आव्हाडाचा निषेध यावेळी सर्व स्तरातून करण्यात येत आहे.

## तरुणाचा १४ वर्षीय मुलीवर बलात्कार

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** घरात भाड्याने राहणाऱ्या दाम्पत्याच्या १४ वर्षीय मुलीचे तोंड दाबून घरमालक युवकाने बलात्कार केला. या प्रकरणी सक्करदरा पोलिसांनी तक्रारीवरून गुन्हा दाखल केला. प्रतिक आसोले (२०) असे आरोपीचे नाव असून त्याला अटक केली आहे.

पीडित भाडेकरू १४ वर्षीय मुलगी आठव्या वर्गात शिकते. ती सावत्र वडील आणि आईसह राहते. आईवडील दोघेही वेगवेगळ्या हॉटेलमध्ये कामाला जातात. त्यामुळे मुलगी घरी एकटीच राहते. गेल्या काही दिवसांपासून घरमालक प्रतिक आसोले हा त्या मुलीवर वाईट नजर ठेवून होता. तिच्याशी वारंवार गोडगोड बोलून मैत्री करण्यासाठी दबाव टाकत होता.

## भिडे वाड्यात सावित्रीबाई फुले स्मारक उभारणार

आधुनिक केसरी न्यूज

**परतूर :** दि. 17 ऑक्टोबर रोजी काल लागलेल्या उच्च न्यायालयाच्या निकालाने पुणे येथे भिडे वाड्यात आता सावित्रीबाई फुले यांचे भव्य स्मारक उभारण्याचा मार्ग मोकळा झाल्याने हा आनंद उत्सव परतूर व पंचक्रोशीतील सकल ओबीसी समाजाच्या वतीने फटाके वाजवून साजरा करण्यात आला. क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांनी पहिली महिलांसाठी शाळा भिडे वाडा पुणे येथे सुरू केली होती. भिडे वाडा पुणे येथे आता सावित्रीबाई फुले स्मारक उभारण्याचा काल दिलेल्या उच्च न्यायालयाच्या निकालावरून आता मार्ग मोकळा झाला आहे. या याचिकेची सुनावणी १३ वर्षानंतर झाली व हा निकाल सत्याच्या बाजूने लागला. हा आनंद उत्सव परतुर शहरांमध्ये सकल ओबीसी समन्वयक समितीने व परतुर व पंचक्रोशीतील ओबीसी समाज बांधवाने मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. यावेळी परतुर व पंचक्रोशीतील सकल ओबीसी समाज उपस्थित होता.



## सैनिक हेच खरे देशाचे आधारस्तंभ : डॉ विजय शिंदे; सैनिक प्रथमेश गायकवाड यांचा सन्मान



आधुनिक केसरी न्यूज

**लोणंद :** सैनिक देशाच्या सीमेवर डोळ्यात तेल घालून सीमांचे रक्षण करत असतात. त्यामुळेच देशातील नागरिक शांततेने झोपू शकतात. देशाचे खरे आधारस्तंभ सैनिकच असतात. प्रथमेशच्या आई-वडिलांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्याचे संगोपन व शिक्षण करून आपला एकुलता एक मुलगा सैन्यात भरती होईपर्यंत परिश्रम घेतले. हे गावच्या दृष्टीने भूषणावह बाब आहे. याचा व प्रथमेश याचा आदर्श इतरांनी घेणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन खंडाळा तालुका विकास प्रतिष्ठानचे सचिव डॉ.विजय शिंदे यांनी केले. भोळी, ता. खंडाळा येथील सुपुत्र प्रथमेश दयानंद गायकवाड यांची भारतीय सैन्य दलात निवड होऊन प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर सिक्कीम येथे सेवेस रुजू होण्यापूर्वी अभिनंदन व शुभेच्छा पर कार्यक्रमाचे आयोजन भीमसागर तरुण मंडळ व भोळी ग्रामस्थ यांच्या वतीने करण्यात आले होते. यावेळी डॉ.विजय शिंदे बोलत होते. दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख रामदास कांबळे, के.एन.पी. पशुवैद्यकीय महाविद्यालय जनसंपर्क अधिकारी नितीन कदम, अजिंक्य चव्हाण, संजय जाधव, बापूसाहेब खुंटे यांची शुभेच्छापर भाषणे झाली. यावेळी विश्वास चव्हाण, अनंत चव्हाण, ऋषिकेश लिमण, काका बनसोडे व इतर अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे संयोजन शरद खुंटे व युवराज खुंटे यांनी केले तर सूत्रसंचालन विजय खुंटे यांनी केले.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर